दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २३३ I शनिवार ६ जून २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com



‘सहजयोग’
भाग ७३

## साडेतीन पीठ विश्वाची कुंडलिनी..

या सह्याद्रीच्या पठारावर आपल्याला माहिती आहे, की साडेतीन वेटोळे घालून विश्वाची कुंडलिनी वसलेली आहे. साडेतीन पीठं जी आहेत, ती ह्या आपल्या महाराष्ट्रात आहेत. इतकंच नव्हे तर अष्टविनायकसुद्धा ह्या महाराष्ट्रात आहेत. म्हणजे आपल्याला पृथ्वीचं फार मोठं देणं आहे आणि फार महत्वाची आपली भूमी आहे आणि ह्या भूमीवर तुम्ही जन्मल्यामुळे ह्या भूमीचं जे दान आहे, ते तुम्हाला रात्रंदिवस मिळत असतं. ह्याचं जे काही खाणं-पिणं वगैरे आहे ते सगळं तुम्हाला मिळत असतं. ते सगळं मिळालेलं आहे. ते सस्यश्यामलां भूमीमध्ये इथे आपण आता इतक्या भरभराटीला आलो, की आपल्याला आश्चर्य वाटेल. परमेश्वरावरची भक्ती वाढली पाहिजे. परमेश्वराच्या साम्राज्यावरही विश्वास ठेवला पाहिजे. पण सुबत्ता आल्याबरोबर माणसाला असं वाटतं ‘मीच हे केलं, मीच ते केलं!’ पण मनुष्य काय करू शकतो? तुम्हीच सांगा. जर एखादं झाड पडलं आणि मेलं, तर त्याचं तुम्ही फर्निचर करू शकता. पण एका ’बी’ ला तरी तुम्ही रोखू शकता का? किंवा एका फळातनं तुम्ही म्हणाल तर बी काढू शकता. पण एका फुलाला तुम्ही फळ करू शकता का? काहीच करू शकत नाही.सर्व जिवंत कार्य आहे. हे परमेश्वराच्या शक्तिने होत असतं. ही परमेश्वराची जिवंत शक्ति आहे, त्यानीच आपल्याला मानवसुद्धा केलं आहे आणि ते सहजच केलं आहे. ’स-ह-ज‘, सह म्हणजे तुमच्याबरोबर जन्मलेला असा हा योगाचा अधिकार आहे, ही तुमच्यामध्ये कुंडलिनी आहे. त्याबद्दल ज्ञानेश्वरांनी सांगितलेलं आहे. अनादीकाळापासून हे चाललेलं आहे. सगळे सहजच व्यवस्था आहे. ही सर्व सृष्टीची रचना सहज आहे. ३०/१२/१९८२ मल्हारपेठ,कोल्हापूर अधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

### महत्त्वाचे..

### जातनिहाय जनगणना होईपर्यंत जातीचे उपवर्गीकरण करू नये : आठवले

मुंबई : देशात २०२७ मध्ये होणारी जातनिहाय जनगणना पूर्ण होईपर्यंत अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करू नये, अशी भूमिका केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा राम दास आठवले यांनी मांडली. मुंबईतील संविधान निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना निर्णय घेण्याची मोकळीक दिली असली तरी कोणत्याही जातीवर अन्याय होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे आठवले म्हणाले. यासाठी प्रथम जातनिहाय जनगणनेची अचूक आकडेवारी उपलब्ध होणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्य सरकारने नियुक्त केलेल्या न्यायमूर्ती अनंत बदर समितीच्या अहवालावर पुनर्विचार करून समिती बरखास्त करावी, अशी मागणीही त्यांनी केली. तसेच या विषयावर रिपब्लिकन पक्षाचे शिष्टमंडळ लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

# मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे सवलती!

## राज्य सरकारचा निर्णय : शैक्षणिक सवलतींचा लाखो विद्यार्थ्यांना मिळणार थेट लाभ

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मराठा समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या अनेक शैक्षणिक सवलती व सुविधा आता मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही लागू करण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना थेट लाभ मिळणार असून उच्च शिक्षणाचा मार्ग अधिक सुलभ होणार आहे.

राज्य सरकारच्या निर्णयानुसार मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना, मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना तसेच व्यावसायिक शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या विविध शुल्क आणि खर्चाची प्रतिपूर्ती अशा अनेक योजनांचा लाभ मिळणार आहे.

याशिवाय महाराष्ट्रातील रहिवासी असलेल्या आणि राज्याबाहेरील अनुदानित अथवा विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या सुविधांचा लाभ देण्यात येणार आहे. ओबीसी विद्यार्थ्यांना ज्या शैक्षणिक सवलती, शुल्क सवलती, शिष्यवृत्ती आणि इतर सुविधा उपलब्ध आहेत, त्या सर्व योजना आता मराठा समाजातील पात्र विद्यार्थ्यांनाही लागू होणार आहेत.

**मराठा समाजासाठी लागू होणाऱ्या प्रमुख शैक्षणिक सवलती**
- शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना
- माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती
- मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना
- शैक्षणिक शुल्क व इतर १६ प्रकारच्या खर्चाची प्रतिपूर्ती



केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर संस्थास्तरावर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या सवलतींचा लाभ मिळणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच भविष्यात ओबीसी प्रवर्गासाठी लागू होणाऱ्या नव्या शैक्षणिक सवलती व सुविधा मराठा समाजालाही आपोआप लागू होतील, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, या निर्णयाचे स्वागत करताना ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेचे कौतुक केले. देवेंद्र फडणवीस हे मराठा समाजविरोधी आहेत, अशी जाणीवपूर्वक बदनामी करण्यात आली. मात्र मराठा समाजाला न्याय देण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारने समाजाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी ऐतिहासिक निर्णय घेतला आहे, असे महाजन म्हणाले. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या या निर्णयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शैक्षणिक क्षेत्रात मराठा समाजातील विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय मैलाचा दगड ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. या निर्णयामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार असून उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेला आर्थिक भार कमी होण्यास मदत होणार आहे. राज्यभरातील मराठा समाज संघटनांनी या निर्णयाचे स्वागत करत सरकारचे आभार मानले आहेत.

## १५.१५ लाख कोटींच्या कथित आर्थिक गैरव्यवहारामुळे खळबळ

### आ. रोहित पवारांनी उपस्थित केले गंभीर प्रश्न

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** सुवर्ण व्यवसायातील आघाडीची कंपनी राजेश एक्स्पोर्ट्स आणि तिचे प्रमुख राजेश मेहता यांच्याविरोधात भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळाने (सेबी) केलेल्या प्राथमिक कारवाईनंतर देशभरात खळबळ उडाली आहे. कंपनीने तब्बल ₹१५.१५ लाख कोटींच्या उलाढालीबाबत दिशाभूल करणारी माहिती दिल्याचा आरोप करण्यात आला असून या प्रकरणावरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

**जीवन विमा महामंडळाच्या गुंतवणुकीवरून आणि बाजार नियामकाच्या भूमिकेवरून राजकीय वर्तुळात चर्चा**




रोहित पवार यांनी सामाजिक माध्यमावरील पोस्टमध्ये हा प्रकार जगातील सर्वात मोठ्या लेखा गैरव्यवहारांपैकी एक ठरू शकतो, असा दावा केला आहे. तसेच इतर अनेक सामूहिक गुंतवणूक योजना आणि वित्तीय संस्था सावध भूमिका घेत असताना भारतीय जीवन विमा महामंडळाने (एलआयसी) या कंपनीत मोठी गुंतवणूक कशी केली, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

सेबीच्या प्राथमिक आदेशानुसार, कंपनीने २०२० ते २०२५ या कालावधीत आपल्या परदेशातील उपकंपनीच्या व्यवहारांच्या आधारे महसूलाचे आकडे फुगवून दाखवल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. कंपनीच्या एकत्रित महसूल आकड्यांपैकी बहुतांश व्यवहारांची पुरेशी **(पान ४ वर)**

## जिममधील तरुणांना प्रोटीनच्या नावाखाली गुंगीकारक इंजेक्शन विक्रीचा डाव उधळला

### शेरु शेख ताब्यात : अहिल्यानगरचा मोहसीन शेख फरार


प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**टाकळीमानुर :** पाथर्डी पोलिसांनी अवैध औषध विक्रीविरोधात धडाकेबाज कारवाई करत जिममधील तरुणांना प्रोटीन व स्नायूवर्धक औषधांच्या नावाखाली गुंगीकारक इंजेक्शन विक्री करण्याच्या संशयित रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या रॅकेटमधील पाथर्डीच्या इंदिरानगर येथील रहिवासी शेरू राजू शेख याला ताब्यात घेतले. तर अहिल्यानगरच्या मुकुंद नगर येथील मोहसीन राजू शेख हा फरार झाला आहे. या कारवाईत ६२ हजार ५०४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकारामुळे पाथर्डीसह अहिल्यानगर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली **(पान ४ वर)**

**६२ हजार ५०४ रुपयांचा मुद्देमाल जप्त**

**तरुणांच्या आरोग्याशी खेळण्याचा प्रकार**

व्यायामशाळांमध्ये शरीरसौष्ठवासाठी येणाऱ्या तरुणांना प्रोटीन किंवा स्नायूवर्धक औषध असल्याचे भासवून डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय गुंगीकारक औषधांची विक्री करण्याचा प्रयत्न होत असल्याची बाब या कारवाईत समोर आली आहे. त्यामुळे अशा बेकायदेशीर औषध विक्रीच्या साखळीचा पोलिसांकडून अधिक तपास सुरू असून तरुणांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या संबंधितांवर आणखी कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



## दरोड्यातील आरोपीचा पोलिसांवर गोळीबार

### खरवंडी येथील थरारक घटना

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**टाकळीमानुर :** सोलापूर जिल्ह्यातील सराफ व्यापाऱ्याच्या दरोडा प्रकरणातील संशयित आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकावर आरोपीने गोळीबार केल्याची थरारक घटना पाथर्डी तालुक्यातील खरवंडी येथे घडली. या गोळीबारात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.मात्र आरोपी पावलस उर्फ मेहेर कचरू गायकवाड (रा. खरवंडी कासार , ता. पाथर्डी) हा आपल्या साथीदारांसह घटनास्थळावरून पसार झाला. या प्रकरणी त्याच्यासह दोन ते तीन अनोळखी साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथील सराफा व्यापारी अभिनंदन काशिनाथ पोद्दार यांना अडवून त्यांच्याकडील सोने लुटल्याप्रकरणी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की सोलापूर जिल्ह्यातील सराफ व्यापाऱ्याच्या दरोडा प्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्याचा समांतर तपास सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू होता. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे या दरोड्यात पावलस उर्फ मेहेर गायकवाड याचा सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय आत्माराम शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पथक पाथर्डी येथे दाखल झाले. पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विलास पुजारी यांच्या समन्वयाने खरवंडी कासार बीटचे पो. कॉ. आसाराम बटुळे व गृहरक्षक मिठू खेडकर यांची मदत घेऊनआरोपीचा शोध सुरू करण्यात आला. गुरुवारी (दि. ४ जून) रात्री सुमारे १०.३७ वाजता आरोपी आपल्या घरासमोर काही साथीदारांसह पाइपलाइनचे काम करत असल्याचे पोलिसांना दिसून आले. **(पान ४ वर)**

## महाडीबीटी पोर्टलवर खरीप बियाण्यांचे वितरण

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने यंदा महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून खरीप हंगामासाठी आवश्यक असलेली प्रमाणित बियाणे आता महाडीबीटी पोर्टलवर प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर जाऊन तात्काळ अर्ज करावेत, असे आवाहन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.

**शेतकऱ्यांनी तात्काळ अर्ज करावेत**

राज्यात यंदा खरीप हंगाम प्रमाणित बियाणे व प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येणार असून त्याअंतर्गत शेतकऱ्यांना विविध पिकांची गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. यामध्ये सोयाबीन, मूग, उडीद, भूईमुग, बाजरी आणि कापूस या प्रमुख पिकांचा समावेश आहे. तसेच या कार्यक्रमांतर्गत राज्यभरात तब्बल २ लाख प्रात्यक्षिके राबविण्यात येणार असून त्याद्वारे शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञान, आधुनिक कृषी पद्धती आणि गुणवत्तापूर्ण निविष्ठांचा प्रत्यक्ष अनुभव दिला जाणार आहे.

योजनेअंतर्गत राज्यभरातील शेतकऱ्यांसाठी सुमारे ३ लाख क्विंटल बियाण्यांचा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामध्ये ६६ हजार ७५० क्विंटल सोयाबीन तसेच ३५ हजार ५०० क्विंटल भूईमूग बियाण्यांचा समावेश असून इतर खरीप पिकांची बियाणेदेखील महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध राहणार आहेत.

## राष्ट्रवादीचे नगरसेवक रिजवान शेख यांचे जात प्रमाणपत्र रद्द

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** शेवगाव नगरपरिषदेतील नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) राखीव जागेवरून निवडून आलेले नगरसेवक रिजवान छोटुभाई शेख यांचा मुलाणी (इतर मागास वर्ग) जातीचा दाखला जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अहिल्यानगर यांनी अमान्य ठरविला असून त्यांचे जात प्रमाणपत्र रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे शेवगावच्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

समितीने १ जून २०२६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार, उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांनी ७ जानेवारी २०२१ रोजी निर्गमित केलेले मुलाणी या प्रवर्गातील जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र जात प्रमाणपत्र पडताळणी अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार संबंधित प्रमाणपत्राच्या आधारे मिळालेले लाभ रद्द व वसुलीपात्र ठरू शकतात, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी शिवसेना शिंदे गटाचे पराभूत उमेदवार प्रताप मुकुंदराव फडके यांनी जातदाव्यावर हरकत घेत तक्रार दाखल केली होती. त्यांनी अर्जदाराने सादर केलेली वंशावळ, पूर्वजांची माहिती आणि जातीच्या दाव्यासाठी वापरलेले पुरावे संशयास्पद असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर जिल्हा जात पडताळणी समितीने दक्षता पथकामार्फत सखोल चौकशी केली.

चौकशीदरम्यान अर्जदाराने सादर केलेल्या अनेक कागदपत्रांमध्ये मुलाणी जातीचा स्पष्ट उल्लेख नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. तसेच कोपरगाव तालुक्यातील धोत्रे येथील मोडी लिपीतील जन्म उताऱ्याची पडताळणी केली असता मूळ शासकीय अभिलेखात संबंधित नोंद उपलब्ध नसल्याचे आढळून आले. याबाबत तहसीलदार, कोपरगाव यांनीही लेखी अभिप्राय दिला होता.

समितीने आपल्या निर्णयात अर्जदाराच्या वंशावळीतील नातेसंबंध सिद्ध करणारे ठोस महसुली अथवा शासकीय पुरावे उपलब्ध नसल्याचे नमूद केले . तसेच विविध कागदपत्रांमधील नावांतील विसंगती, मूळ गावाबाबत पुरेशा पुराव्यांचा अभाव आणि पारंपरिक मुलाणी’ व्यवसायाचा दस्तऐवजी पुरावा सादर करण्यात आलेले अपयश या बाबींचाही उल्लेख केला आहे.दुसरीकडे, अर्जदाराने तक्रार राजकीय हेतूने व निवडणुकीतील पराभवानंतर सूडबुद्धीने करण्यात आल्याचा दावा केला होता. तसेच काही जुने दस्तऐवज, शपथपत्रे आणि सामाजिक परंपरेच्या आधारे आपला दावा योग्य असल्याचे समितीसमोर मांडले होते. मात्र समितीने उपलब्ध पुरावे, दक्षता पथकाचा अहवाल, दोन्ही पक्षांचा युक्तिवाद आणि कायदेशीर तरतुदींचा विचार **(पान ४ वर)**

## मान्सून महाराष्ट्राच्या वेशीवर

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** मान्सून ४ मे केरळमध्ये दाखल झाला. केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याची अधिकृत घोषणा भारतीय हवामान विभागाने केली होती. गोव्यामध्ये ही महाराष्ट्राच्या सरी बरसल्या. आता मान्सून महाराष्ट्राच्या वेशीवर पोहोचला आहे.



परभणी जिल्ह्यात आज सायंकाळी विविध भगत मॉन्सूनपूर्व पावसाने दमदार हजेरी लावत नागरिकांना उकाड्यापासून मोठा दिलासा दिला. विजांचा गडगडाट वादळी वाऱ्यासह झालेल्या जोरदार पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या तापमानामुळे हैराण झालेल्या परभणीकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.

काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची जोरदार बरसात झाली.अचानक आलेल्या पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचले, तर शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. पावसामुळे शहरासह ग्रामीण भागातील वातावरण प्रसन्न झाले असून आगामी मान्सूनच्या आगमनाची चाहूल लागली आहे. यंदा मान्सूनचा प्रवास ३ दिवस उशिराने, मान्सून केरळात १ जून रोजी दाखल होत असतो, मात्र यंदा तो ३ जून रोजी दाखल झाला आहे. याचदरम्यान, हवामान विभागाचे तज्ज्ञ प्रवीण कुमार यांनी महत्वाची माहिती दिली आहे.

## धावत्या कंटेनरमधून अचानक धूर; सहा नव्या गाड्या आगीत भस्मसात

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** दुपारचे कडक ऊन, नाशिक-पुणे महामार्गावर नेहमीप्रमाणे सुरू असलेली वाहनांची वर्दळ आणि नव्या चारचाकी वाहनांनी भरलेला कंटेनर नाशिकच्या दिशेने धावत होता. मात्र संगमनेर बायपासजवळील कृष्णा लॉन्स परिसरात काही क्षणांतच सर्व काही बदलले. कंटेनरमधून अचानक धूर निघू लागला आणि काही वेळातच भीषण आगीने संपूर्ण वाहनाला विळखा घातला.

शुक्रवारी (५ जून) दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या घटनेने परिसरातील नागरिकांची एकच धावपळ उडाली. कंटेनरमध्ये सहा नवीन चारचाकी वाहने होती. चालकाच्या लक्षात आग लागल्याचे येताच त्याने प्रसंगावधान राखत कंटेनर रस्त्याच्या कडेला उभा केला. त्याच्या या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला.

घटनास्थळी उपस्थित नागरिकांनीही वेळ न दवडता मदतीसाठी धाव घेतली. आग विझविण्याचे प्रयत्न सुरू झाले; मात्र काही क्षणांतच ज्वाळांनी रौद्ररूप धारण केले. कंटेनरमधील नवकोऱ्या गाड्या एकामागून एक आगीच्या भक्ष्यस्थानी पडताना पाहून उपस्थितांच्या काळजाचा ठोका चुकला.




घटनेची माहिती मिळताच घुलेवाडी येथील सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. चालक आकाश बनसोडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अथक प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र तोपर्यंत कंटेनरमधील सहाही नवीन चारचाकी वाहने पूर्णपणे जळून खाक झाली होती.

**■ आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाले असले तरी या घटनेतील सर्वात दिलासादायक बाब म्हणजे कोणतीही जीवितहानी झाली नाही. चालकासह सर्वजण सुरक्षित राहिल्याने उपस्थितांनी सुटकेचा निश्वास सोडला. सध्या सुरू असलेल्या तीव्र उष्णतेचा परिणाम किंवा तांत्रिक बिघाड यापैकी एखादे कारण आगीमागे असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. नव्या कोऱ्या गाड्या काही क्षणांत राख झाल्याचे दृश्य मात्र अनेकांच्या मनात हळहळ निर्माण करून गेले. या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.**

# कर्नाटकातील निर्णय आणि लोकशाहीतील आशेचा किरण




कर्नाटकातील सत्तांतराच्या ताज्या घडामोडी केवळ एका राज्यातील मुख्यमंत्री बदलाचा विषय नाहीत. त्या भारतीय राजकारणातील बदलत्या वास्तवाचे, पक्षांतर्गत लोकशाहीचे आणि राजकीय शहाणपणाचे प्रतीक आहेत. डी. के. शिवकुमार यांच्या हाती कर्नाटकच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे सोपवण्याचा काँग्रेसचा निर्णय हा अलीकडच्या काळातील दुर्मीळ पण दूरदृष्टी दाखवणारा राजकीय निर्णय मानावा लागेल.

भारतीय राजकारणात अनेकदा निष्ठेपेक्षा संधीसाधूपणा, संघर्षापेक्षा सत्तेची जवळीक आणि कार्यकर्तेपेक्षा घराणेशाहीला महत्त्व दिले जाते. अशा वातावरणात डी. के. शिवकुमार यांची राजकीय वाटचाल वेगळी ठरते. केंद्रीय तपास यंत्रणांचा दबाव, तुरुंगवास, राजकीय छळ आणि प्रचंड दबाव असूनही त्यांनी पक्षांतराचा मार्ग स्वीकारला नाही. आजच्या काळात सत्ता मिळवण्यासाठी पक्ष बदलणे हा जणू राजकीय संस्काराचा भाग बनला असताना शिवकुमार यांनी दाखवलेली पक्षनिष्ठा वेगळी ठरते.

२०२३ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला मिळालेल्या यशामागे शिवकुमार यांचे योगदान निर्णायक होते. तरीही मुख्यमंत्रीपदासाठी त्यांना प्रतीक्षा करावी लागली. जातीय समीकरणे, ज्येष्ठतेचा मुद्दा आणि राजकीय संतुलन यांचा विचार करून सिद्धरामय्या यांना संधी देण्यात आली. शिवकुमार यांनी त्यावेळी संयम दाखवला. सत्तेसाठी संघर्ष करणारा नेता अडीच वर्षे शांतपणे उपमुख्यमंत्री म्हणून काम करतो, ही बाबही आजच्या राजकारणात दुर्मीळच म्हणावी लागेल.

काँग्रेसने यापूर्वी राजस्थान आणि पंजाबमध्ये अशाच प्रकारच्या चुका केल्या होत्या. राजस्थानात सचिन पायलट यांच्यासारख्या तरुण नेतृत्वाला डावलण्यात आले, तर पंजाबमध्ये नेतृत्वबदलाचा निर्णय उशिरा घेतला गेला. परिणामी दोन्ही राज्यांत काँग्रेसला सत्ता गमवावी लागली. कर्नाटकात मात्र त्या चुका टाळण्यात आल्या आहेत. निवडणुकांना दोन वर्षे शिल्लक असताना नेतृत्वबदल करून नव्या उर्जेला संधी देण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला.

या निर्णयामागे सामाजिक आणि राजकीय गणितही महत्त्वाचे आहे. शिवकुमार हे कर्नाटकातील प्रभावी वोक्कलिग समाजाचे नेते आहेत. भाजपला लिंगायत समाजाचा पाठिंबा असताना जनता दलाचे आधारस्तंभ असलेल्या वोक्कलिग मतदारांमध्ये काँग्रेसला अधिक मजबूत करण्याची क्षमता शिवकुमार यांच्यात आहे. त्याचवेळी दलित समाजातील डॉ. जी. परमेश्वरा यांना उपमुख्यमंत्रीपद देऊन सामाजिक समतोल साधण्याचाही प्रयत्न करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रक्रियेत सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे काँग्रेसने राज्यातील नेतृत्वावर विश्वास दाखवला. भारतीय राजकारणातील अनेक राष्ट्रीय पक्षांची समस्या म्हणजे दिल्लीतील नेतृत्वाचा अतिरेकी हस्तक्षेप. राज्यातील वास्तव, स्थानिक सामाजिक समीकरणे आणि जनतेच्या अपेक्षा यापेक्षा पक्षश्रेष्ठींचे राजकारण अधिक प्रभावी ठरते. यामुळे अनेक सक्षम प्रादेशिक नेते दुर्लक्षित झाले आणि त्यातूनच राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस यांसारख्या पक्षांचा जन्म झाला.

आज परिस्थिती बदलली आहे. प्रादेशिक पक्षांची ताकद कमी होत आहे. दुसरीकडे भाजपची संघटनात्मक ताकद वाढत आहे. अशा परिस्थितीत राष्ट्रीय स्तरावर सक्षम विरोधी पक्ष म्हणून काँग्रेसचे अस्तित्व लोकशाहीसाठी आवश्यक आहे. लोकशाही केवळ सत्ताधारी पक्षाच्या बळावर मजबूत होत नाही; तर सक्षम आणि प्रभावी विरोधकांमुळे ती अधिक सुदृढ होते.

कर्नाटकातील निर्णयाकडे म्हणूनच केवळ मुख्यमंत्री बदल म्हणून पाहता येणार नाही. हा निर्णय पक्षनिष्ठेला दिलेले बक्षीस आहे. तो नव्या नेतृत्वाला दिलेली संधी आहे. तो सामाजिक समतोल राखण्याचा प्रयत्न आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो पक्षश्रेष्ठींच्या अहंकारापेक्षा राज्याच्या राजकीय गरजांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न आहे.

काँग्रेससमोर अजूनही अनेक आव्हाने आहेत. संघटनात्मक कमकुवतपणा, नेतृत्वावरील प्रश्न आणि अनेक राज्यांतील मर्यादित प्रभाव ही वास्तव आहेत. मात्र कर्नाटकातील निर्णयाने एक गोष्ट स्पष्ट केली आहेकाँग्रेसने जर वास्तव स्वीकारले, राज्यातील नेतृत्वावर विश्वास ठेवला आणि कार्यकर्त्यांच्या योगदानाचा सन्मान केला, तर पुनरुज्जीवनाची शक्यता अद्याप संपलेली नाही.

या निर्णयाचे महत्त्व काँग्रेसच्या भवितव्यापुरते मर्यादित नाही. प्रश्न एका पक्षाचा नसून भारतीय लोकशाहीतील सत्तासंतुलनाचा आहे. मजबूत विरोधकांशिवाय लोकशाही अपुरी राहते. त्यामुळे कर्नाटकातील हा निर्णय भारतीय राजकारणासाठी आशेचा किरण मानावा लागेल.

# खांबेगावात काँग्रेसला खिंडार शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** तालुक्यातील खांबे गावात काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसला असून विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे पदाधिकारी आणि शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांनी गुरुवारी (दि. ४) सायंकाळी आ. अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. आ. खताळ यांच्या कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्यात ''तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

आमदार अमोल खताळ कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की , गेल्या चाळीस वर्षांत अपेक्षित विकास झाला नाही. मात्र महायुती सरकारच्या माध्यमातून गेल्या दीड वर्षांत तालुक्यात विविध विकासकामांना गती देण्यात आली असून मतदारसंघाचा चेहरा-मोहरा बदलत आहे. खांबे गावाच्या विकासासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमास खांबे ग्रामपंचायतीचे सरपंच रविंद्र दातीर, सोसायटीचे अध्यक्ष लक्ष्मण जोशी, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रमेश काळे, विठ्ठल दातीर, बाबासाहेब दातीर, रामेश्वर शिंदे, दिगंबर दातीर, गबाजी कोरडे, भिकाजी वाघ, प्रेमराज बुधे आदी मान्यवर उपस्थित होते.

काँग्रेसमधून शिवसेनेत प्रवेश करणारे कार्यकर्ते... पुंजा जोशी, सुखदेव भतांबरे, रावसाहेब भांड, बाबूराव कापडी, बारकू पेकारी, बाबा एकनाथ जोशी, नवनाथ दातीर, एकनाथ दातीर, सुभाष केदार, राजू शेंडगे, बाळासाहेब दातीर, खुशाल वाघ, जनार्दन जोरी, संजय दातीर, ठकाजी दातीर, नामदेव दातीर, ज्ञानेश्वर दातीर, रवी जोरी, सोमनाथ शेंडगे, माणिक जोरी, भाऊसाहेब शेंडगे, सखाराम दातीर, रविराज जोशी, पवन जोशी यांच्यासह शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

विकासाच्या जोरावर शिवसेनेची ताकद वाढणार केंद्र व राज्यात महायुतीचे सरकार असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून तालुक्यातील विकासकामांना वेग मिळत आहे. खांबे गावातील हा पक्षप्रवेश सोहळा साकूर पठार भागात शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढविणारा ठरेल. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुकांत या भागात शिवसेनेचा भगवा निश्चित फडकेल,'' असा विश्वास आ. अमोल खताळ यांनी व्यक्त केला.




# न्यू इंग्लिश स्कूल, कोल्हार बुद्रुक येथे पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, कोल्हार बुद्रुक येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. विद्यालयाचे माजी विद्यार्थी शिरीष कापसे यांनी त्यांचा मुलगा राजवीर यांच्या पाचव्या वाढदिवसानिमित्त विद्यालयास पाच वृक्ष भेट दिली व सामाजिक बांधिलकी जपली. यावेळी त्यांचे आई-वडील व पत्नी तसेच वाढदिवस असलेला त्यांचा मुलगा या कार्यक्रमास उपस्थित होता. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत त्यांनी विद्यालयाला विविध देशी वृक्षांची रोपे भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमास विद्यालयाचे प्राचार्य जामदार ए. बी., पर्यवेक्षिका आंधळे एस. बी., गुरुकुल प्रमुख कचरे के. आर. तसेच विभाग प्रमुख घवले डी. ए. उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक शेख एस. बी. यांनी केले.

यावेळी प्राचार्य अंकुशराज जामदार यांनी देशी वृक्षांचे पर्यावरण संवर्धनातील महत्त्व विशद करताना प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनीही वृक्षसंवर्धनाची शपथ घेत पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण झाली असून परिसर हरित करण्याचा संदेश देण्यात आला. घोडके सरांनी सर्वांचे आभार व्यक्त केले




# ७३ वर्षांचा ऐतिहासिक ठेवा

## नेवासा नगरपंचायतीतील कपाट आजही सेवेत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** एखादी वस्तू केवळ उपयोगाची नसून इतिहासाची साक्ष देणारी असते. नेवासा नगरपंचायत कार्यालयातील असेच एक लाकडी कपाट गेल्या सुमारे ७३ वर्षांपासून शासकीय कारभाराचा मूक साक्षीदार बनून उभे आहे. या कपाटावर चिकटविलेल्या जुन्या कागदावरील १९५३ सालच्या कॅलेंडरमुळे या कपाटाचा इतिहास समोर आला आहे.

नेवासा खुर्द येथे २१ मार्च १९४० रोजी ग्रामपंचायतीची स्थापना झाली,१९५३ पासून हे कपाट वापरात असावे, गेल्या सात दशकांहून अधिक काळात ग्रामपंचायतीच्या कारभारात अनेक सरपंच, ग्रामसेवक व कर्मचारी आले-गेले; मात्र या सर्वांनी याच कपाटाचा वापर कार्यालयीन कामकाजासाठी केला.

सन २०१६ मध्ये नेवासा ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रूपांतर झाले. त्यावेळी ग्रामपंचायतीचे सर्व दस्तऐवज, साहित्य आणि ऐतिहासिक नोंदी नगरपंचायतीच्या ताब्यात आल्या. त्यामध्ये हे जुने कपाटही समाविष्ट होते. विशेष म्हणजे, या कपाटाचे जतन सर्वांनी जाणीवपूर्वक केले असून आजही ते सुस्थितीत आहे.

सध्या जनगणना लिपिक राजेश्वर सोनवणे हे या कपाटाचा वापर करीत आहेत. एवढ्या वर्षांनंतरही कपाटाला कोणतीही मोठी इजा झालेली दिसून येत नाही. त्यातील खिळे आजही मूळ अवस्थेत आहेत. कपाटाच्या बाजूला चाव्या ठेवण्यासाठी लावलेले खिळे तसेच आहेत. तसेच कपाट बंद ठेवण्यासाठी वापरला जाणारा लाकडी कोंडा ज्याला काहीजण 'घोडा' असेही म्हणतात, तोदेखील मूळ स्वरूपात जतन झालेला आहे.

हे कपाट केवळ एक कार्यालयीन साहित्य नसून नेवासा शहराच्या प्रशासकीय इतिहासाचा जिवंत पुरावा आहे. अनेक दशकांचा कारभार, बदलती व्यवस्था आणि काळाचा प्रवास अनुभवलेला हा ऐतिहासिक ठेवा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.हे कपाट म्हणजे आपल्या प्रशासकीय परंपरेची अमूल्य आठवण आहे. या ऐतिहासिक ठेव्याचे जतन करण्याची आमची जबाबदारी आहे.





पुढील १०० वर्षांपर्यंतही ते सुरक्षित ठेवण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, उपनगराध्यक्षा सौ.शालिनीताई संजय सुखदान आणि जनगणना लिपिक राजेश्वर सोनवणे यांनी सांगितले.इतिहास जपणाऱ्या अशा वस्तूंचे संवर्धन ही काळाची गरज असून नेवासा नगरपंचायतीने जपलेला हा ७३ वर्षांचा ठेवा निश्चितच कौतुकास्पद आहे.

# बाभळेश्वरची रोपवाटिका ठरते शेतकऱ्यांचा विश्वासार्ह आधार;

## दर्जेदार डाळिंब रोपांना वाढती मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** शेतकऱ्यांना दर्जेदार, रोगमुक्त आणि तंत्रशुद्ध पद्धतीने तयार केलेली फळबागांची रोपे उपलब्ध करून देणारी बाभळेश्वर येथील पायरेन्स संचलित कृषी विज्ञान केंद्राची रोपवाटिका आज शेतकऱ्यांसाठी विश्वासार्ह आधार ठरत आहे. विशेषतः रोगमुक्त डाळिंब रोपांच्या निर्मितीमुळे या रोपांना मोठी मागणी निर्माण झाली असून अहिल्यानगरसह परिसरातील विविध जिल्ह्यांतील शेतकरी येथे मोठ्या प्रमाणात रोपे खरेदीसाठी येत आहेत.

रोपवाटिकेत फुले भगवा डाळिंब, सरदार पेरू, केशर आंबा, सुधारित शेवगा तसेच विविध शोभिवंत व फुलझाडांची निर्मिती केली जाते. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार गुणवत्तापूर्ण रोपे तयार केली जात असल्याने या रोपांना विशेष पसंती मिळत आहे.

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, शालिनीताई विखे, डॉ. सुजय विखे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे, संचालक डॉ. उत्तमराव कदम, सचिव डॉ. निलेश बनकर आणि प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही रोपवाटिका कार्यरत आहे.



शेतकऱ्यांना रोपांबरोबरच फळबाग व्यवस्थापन, लागवड तंत्रज्ञान, कीड-रोग नियंत्रण आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शनही दिले जाते. शासनमान्य रोपवाटिकेत शास्त्रशुद्ध पद्धतीने रोपे तयार केली जात असल्याने राज्यभरातून या रोपांना मागणी असल्याची माहिती उद्यानविद्या विभागाचे प्रमुख डॉ. विलास घुले यांनी दिली. डाळिंब लागवडीचे क्षेत्र वाढत असताना गुणवत्तापूर्ण रोपे उपलब्ध करून फळबाग विकासाला चालना देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ही रोपवाटिका करत आहे.

# नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करणे काळाची गरज : आ. आशुतोष काळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. हवामान बदलाचे संकट आणि वाढते तापमान यावर मात करायची असेल तर प्रत्येकाने हरित पर्यावरणासाठी वृक्षारोपण करणे आणि आपल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करण्याचा दृढ संकल्प करणे काळाची गरज असल्याचे मत आमदार आशुतोष काळे यांनी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या वतीने पर्यावरण दिनाचे औचित्य साधत परिसरात वृक्षरोपण करण्यात आले यावेळी व्यक्त केले.




औद्योगिक आणि सामाजिक प्रगती साधत असताना आपण निसर्गाचे देणे लागतो ही भावना विसरून चालणार नाही. कारखान्यासारख्या औद्योगिक परिसरात हरित पट्टा निर्माण केल्याने प्रदूषण नियंत्रणात मोठी मदत होते. केवळ झाडे लावणे पुरेसे नसून त्यांचे संगोपन करून ती जगवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. यावर्षी शासनाने पर्यावरण दिनानिमित्त पृथ्वी देत असलेल्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करू नका, हवामानासाठी त्वरित कृती करणे गरजेचे असल्याची संकल्पना ठरवली आहे. प्रत्येकाने या संकल्पनेचा गांभीर्याने विचार करून एक नागरिक एक झाड ही संकल्पना प्रत्येकाने आपल्या जीवनात उतरवण्याचे आवाहन यावेळी आ. आशुतोष काळे यांनी उपस्थितांना केले.याप्रसंगी कारखान्याचे संचालक मंडळ सदस्य, अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाजामध्ये सत्य विचाराच्या चळवळीसाठी प्रयत्न होणे आवश्यक : माजी आ. कानडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील प्रवरासंगम येथे सामाजिक सद्यस्थिती यावर विचार मंथन झाले.माजी आमदार लहुजी कानडे यांनी सध्याच्या सामाजिक स्थितीबाबत अनेक मुद्दे विस्ताराने मांडले. समाजामध्ये सत्य विचाराच्या चळवळीसाठी प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन माजी आ. लहु कानडे यांनी यावेळी बोलतांना केले.

वैचारिक समारंभाच्या अध्यक्षस्थानी माजी कुलगुरू डॉक्टर अशोकराव ढगे होते. डॉक्टर ढगे यांनी शास्त्रज्ञांनी संशोधनावर समाजापुढे सत्याची चळवळ उभारणी काळाची गरज असल्याचे सांगत आज शेतकरी उपेक्षित व दुःखी आहे. जगातल्या २२० देशापैकी फक्त भारतात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात. त्यासाठी शेतकरी संरक्षण कायदा मसुदा राज्यस्तरीय पातळीवर तयार करण्यात आला असून शेतकरी संरक्षण कायदा आला पाहिजे असे त्यांनी स्पष्ट केले.

माजी आमदार लहुजी कानडे म्हणाले की फुले यांनी सत्यप्रबोधन सर्वप्रथम या देशामध्ये आग्रही मांडणी करून समाजासमोर आणले. समाजाने नेहमी सत्य विचाराला प्राधान्य दिले पाहिजे फुलेंचा सत्याचा विचार पुढे महात्मा गांधी यांनी अंगीकारला. आजही सत्य विचाराची गरज चळवळीच्या माध्यमातून उभी राहणे आवश्यक असून उसाचे उत्पादन खर्च एकरी किमान दहा हजार रुपये कमी करण्यासाठी व उत्पादनात एकरी वाढ होण्यासाठी तंत्रज्ञान वापर कसा करता येईल यासाठी प्रश्न उपस्थित करून शेतकऱ्यांना श्रीरामपूर तालुक्यात उसासाठी मार्गदर्शनाची सोय करणार असल्याचे अधोरेखित केले.

आरपीआयचे नेते साईनाथ शिरसाट यांनी राखीव जागा बाबत प्रश्न उपस्थित केला व हळूहळू आरक्षण कमी होत जाणार अशी शंका निर्माण केली. वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूटचे ऊस शास्त्रज्ञ डॉ. रमेश हापसे यांनी ए आय तंत्रज्ञानाचा उहापोह केला.




हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# निळवंडेचा कालवा उशाशी, तरीही पानोडीकरांच्या घशाला कोरड!

## ग्रामपंचायतीच्या नियोजनाचा बोजवारा; ग्रामस्थांत तीव्र संताप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील पानोडी गावात सध्या पाणी उशाशी आणि घशाला कोरड अशी विदारक स्थिती पाहायला मिळत आहे. निळवंडे धरणाचा उजवा कालवा गावातून वाहत असूनही, केवळ ग्रामपंचायतीच्या नियोजनाअभावी आणि ढसाळ कारभारामुळे ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. काही ठिकाणी पाण्याचा अपव्यय होत आहे, तर दुसरीकडे सामान्य नागरिक थेंब थेंब पाण्यासाठी तरसत असल्याने ग्रामस्थांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे.



### 'काही जण तुपाशी, तर काही उपाशी'

गावातील नळ पाणीपुरवठा योजनेत प्रचंड विषमता दिसून येत आहे. काही प्रभागांमध्ये आणि ठराविक लोकांच्या घरी मुबलक पाणी मिळत आहे. परिस्थिती इतकी गंभीर आहे की, काही लोक या पाण्याचा वापर थेट चेंबरमध्ये किंवा घरासमोरील गटारे वाहतील इतक्या मोठ्या प्रमाणावर करत आहेत. एकीकडे पाण्याचा हा असा अपव्यय सुरू असताना, दुसरीकडे मात्र अनेक कुटुंबांना साधे पिण्याचे पाणीही वेळेवर मिळत नाहीये. 'काही जण तुपाशी तर काही जण उपाशी' अशीच अवस्था सध्या पानोडी गावात निर्माण झाली आहे.

### ग्रामसेवकाची उडवाउडवीची उत्तरे

या गंभीर समस्येबाबत जेव्हा जागरूक ग्रामस्थ ग्रामपंचायतीत विचारणा करायला जातात, तेव्हा ग्रामसेवक आणि संबंधित कर्मचाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे मिळण्याऐवजी उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. प्रशासकीय अनास्थेमुळे सामान्य जनतेने दाद कोणाकडे मागायची, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

मार्च महिन्यात ग्रामपंचायतीने पाणीपट्टी वसुलीसाठी कडक मोहीम राबवली होती. मात्र, धक्कादायक बाब अशी की, केवळ २० ते ३० प्रामाणिक नागरिकांनीच पाणीपट्टी भरली आहे. ज्यांनी थकबाकी ठेवली आहे, त्यांच्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई ग्रामपंचायतीने केलेली नाही. उलट, पाणीपट्टी न भरणाऱ्यांनाच मुबलक पाणी मिळत असून, कर भरणाऱ्यांना मात्र पाण्यासाठी रांगा लावाव्या लागत आहेत, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

गावठाणातील विहिरीतून २४ तास एका तलावात पाणी उपसा करून सोडले जाते. असे असतानाही गावठाणात केवळ एकाच वेळी पाणी का सोडले जाते? पाणी उपसा २४ तास सुरू असेल, तर ग्रामस्थांना मुबलक आणि योग्य वेळी पाणी का मिळत नाही? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

एकूणच पानोडी ग्रामपंचायतीचा कारभार सध्या 'रामभरोसे' सुरू असून, निळवंडेचे पाणी गावात असूनही ग्रामस्थांना कृत्रिम पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. या प्रकरणी वरिष्ठ प्रशासनाने लक्ष देऊन पाण्याचे समान वाटप करावे आणि अपव्यय करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी पानोडीकरांनी केली आहे.

## द•ख•ल

### सावित्रीबाई फुले विद्यालयात वृक्ष लागवड



**राहुरी :** ५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय कृषी विद्यापीठ राहुरी येथे विद्यालयाच्या परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली. मुख्याध्यापक अरुण तुपविहीरे यांच्या मार्गदर्शनाखाली लावलेल्या सर्व वृक्षांना ट्री गार्ड लावले जातील प्रत्येक झाड विद्यार्थ्यांना दत्तक दिले जाईल त्याची जोपासना विद्यार्थी व शिक्षकांमार्फत करण्यात येईल.शालेय परिसरात पर्यावरण दिनाचे औचित साधून जांभूळ, आंबा, पिंपळ,वड हे वृक्ष लावण्यात आले.याकरिता एनसीसी विद्यार्थी तसेच एनसीसी अधिकारी संतोष जाधव गोकुळ ठाकूर ग्रंथपाल बबन कसाब ,वरिष्ठ लिपिक भानुदास आढाव,सुरक्षा रक्षक भरत नजन यांच्यासह कर्मचारी किशोर बर्डे, यश गांगुर्डे, शैलेश परदेशी,नंदकिशोर वाघ यांनी बहुमलाचे सहकार्य केले.

### श्रीरामपूरात 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण



**श्रीरामपूर :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाअंतर्गत श्रीरामपूर शहर भारतीय जनता पक्ष व भाजपा युवा मोर्चाच्या वतीने पंचशीलनगर, जुन्या कचेरी परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, डॉ. सुजय विखे, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर आणि शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन मारुती बिंगले व युवा मोर्चा शहराध्यक्ष रुपेश हरकल यांनी केले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमास भाजपा गटनेते वैशाली चव्हाण, नगरसेवक दीपक चव्हाण, माजी नगरसेवक रवी गुलाटी, तिलक डुंगरवाल, सरचिटणीस विशाल अंभोरे, विजय आखाडे, आनंद बुधेकर, डॉ. स्वाती चव्हाण, अरुण धर्माधिकारी, पुष्पा हरदास, पूजा चव्हाण, राजलक्ष्मी चव्हाण यांच्यासह युवा मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यावरण संरक्षणासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अशोकनगर येथे वृक्षारोपण

**अशोकनगर :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अशोक उद्योग समूहाचे सूत्रधार माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या प्रेरणेने अशोक सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. कारखान्याचे व्हा. चेअरमन बाबासाहेब आदिक यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध ठिकाणी कडुलिंब, गुलमोहर, चिंच, जांभूळ, अशोका आदी वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना बाबासाहेब आदिक यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. वाढते प्रदूषण, दुष्काळ, पाणीटंचाई आणि हवामानातील बदल यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असल्याचे सांगत प्रत्येकाने वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करण्याची गरज व्यक्त केली. दोन परिपूर्ण वाढलेली झाडे चार जणांच्या कुटुंबासाठी आवश्यक असलेला ऑक्सिजन निर्माण करतात, असेही त्यांनी नमूद केले. औद्योगिकीकरणामुळे रस्त्यांचे जाळे वाढत असताना वृक्षसंवर्धनाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमास कार्यलक्षी संचालक वसंत भांड, विक्रांत भागवत, मिलिंद कुलकर्णी, ज्ञानेश्वर चिरमे, प्रदीप शिंदे, किरण काळभोर, सुनील बारसे, ज्ञानेश्वर सांगळे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षसंवर्धनाचा निर्धार करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# अंभोरे धरणातून देवनदी बंधाऱ्यांत पाणी सोडले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेऊन पिण्यासाठी तसेच जनावरांसाठी तालुक्यातील अंभोरे धरणातून देव नदीवरील बंधाऱ्यात पाणी सोडण्यात यावे या ग्रामस्थांच्या मागणीची तात्काळ जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ यांनी दखल घेतली असून जलसंपदा विभागाने शुक्रवारी( दि.५) अंभोरे धरणातून देवनदी बंधाऱ्यात पाणी सोडले आहे.त्यामुळे ग्राम स्थांनी मंत्री विखे-पाटील व आमदार खताळ यांचे आभार मानले आहे.



अंभोरे परिसरात उन्हाच्या तीव्रतेमुळे पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या पाण्याची गंभीर टंचाई निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर अंभोरे धरणातून देवनदीवरील बंधाऱ्यात पाणी सोडण्यात यावे अशी मागणी महायुतीचे संपत खेमनर, कोंडाजी कडनर,.संतोष बलसाने, संदिप जगनर, सुरजित खेमनर, रामा बर्डे, देवराम खेमनर.,मोहन खेमनर, भाऊसाहेब पाटोळे, खंडू नवले, रावसाहेब आभाळे यांच्यासह अंभोरे ग्रामस्थांनी मंत्री विखे पाटील तसेच आमदार खताळ पा यांच्याकडे केली होती. त्यानुसार तात्काळ पाणी सोडण्याचे आदेश जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. त्यामुळे अधिकाऱ्यांनी अंभोरे धरणातून देवनदी बंधाऱ्यांत पाणी सोडले आहे. परिसरातील नागरिकांची पिण्याची तसेच जनावरांच्या पाण्याचीही गैरसोय दूर झाली आहे. उन्हाळ्याच्या काळामध्ये निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या संकटातून अंभोरेकरांना दिलासा मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## जागतिक दुग्ध दिनानिमित्त 'नवप्रभा' प्रकल्पाची घोषणा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** जागतिक दुग्ध दिनानिमित्त दैवत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने नवप्रभा प्रकल्पांतर्गत ५० ते ६० गावांमध्ये 'संजीवन नॅनो डेअरी फार्म क्लस्टर' उभारण्याची महत्त्वाकांक्षी घोषणा करण्यात आली. गोसखी आणि दैवत दीदी यांच्या माध्यमातून दुग्ध व्यवसायाला बहुआयामी उद्योगाचे स्वरूप देण्याचा संकल्प यावेळी मांडण्यात आला.दैवतम ग्रुप ऑफ इंडस्ट्रीचे चेअरमन केशवराव शिंदे यांनी सांगितले की, दूध हे केवळ पोषणाचे साधन नसून ग्रामीण अर्थव्यवस्था, रोजगार आणि शाश्वत विकासाचा आधार आहे. भविष्यात दुग्ध व्यवसायासोबत शेण, गोमूत्र, सेंद्रिय खत, बायोगॅस, ऊर्जा निर्मिती, चारा उत्पादन आणि मूल्यवर्धित दुग्धजन्य पदार्थ यांचा समावेश करून पशुपालकांच्या उत्पन्नाचे विविध स्रोत निर्माण करणे आवश्यक आहे.प्रत्येक क्लस्टरमध्ये सामायिक सुविधा केंद्र उभारून पशुखाद्य, सायलेज, हिरवा चारा, खनिज मिश्रण, कृत्रिम रेतन, लसीकरण, पशुवैद्यकीय सेवा आणि दूध गुणवत्ता व्यवस्थापनाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उक्कलगाव येथे ५१ वृक्षांची लागवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि वाढत्या प्रदूषणावर मात करण्यासाठी यंदाच्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव येथे ग्रामपंचायतीचे उपसरपंच नितीन थोरात यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला.



यावेळी जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने ५१ वृक्षारोपण करण्याची मोहिम महाराष्ट्र राज्याध्यक्ष,सामजिक कल्याण एवं मानव संरक्षण संघ, श्री स्वामी समर्थ शैक्षणिक संस्था पुणे येथील व उक्कलगावचे भुमिपूत्र डॉ.किशोर आण्णासाहेब थोरात यांच्या कुंटूबियाच्यावतीने तसेच, उक्कलगाव ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने 'एक झाड दत्तक घ्या' 'पृथ्वी वाचवा भविष्य घडवा' या योजनेचे औचित्य साधून विशेष कार्यक्रम नदीकाठ परिसरात व ग्रामपंचायत आवारात कार्यक्रम संपन्न झाला.याप्रसंगी सरपंच रविना शिंदे, ग्रामपंचायत सदस्य अनिल थोरात,दिलीप थोरात,शरद थोरात सोसायटीचे व्हा.चेअरमन शरद थोरात,युवराज थोरात, सुरेश जगधने, आदिनाथ जगधने, सुभाष थोरात, रोहिदास गोळे, भास्कर थोरात, नितीन फुलपगार, सखाहरी थोरात, विशाल गायकवाड आदी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यासह ग्रामविकास अधिकारी सुभाष पवार, ग्राम महसूल अधिकारी श्री.धरम आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी ग्रामस्थांना अनेक वृक्षांचे वाटप करण्यात आले.यावेळी डॉ.किशोर थोरात म्हणाले की,सन १९७२ पासून जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जात आहे. दिवसेंदिवस दुष्काळाची वाढती तीव्रता, पाणी टंचाईची स्थिती तसेच पावसाचे अनियमित आगमन यामुळे पर्यावरण संतुलन बिघडू लागले आहे. तापमान रोखण्यासाठी वृक्षलागवड करून वातावरणातील समतोल राखणे गरजेचे आहे.

## नदीपात्रात पाणी नसताना देखील लाभार्थ्यांना वाळूचा पुरवठा प्रलंबित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** तालुक्यातील अनेक घरकुल लाभार्थ्यांना शासनामार्फत देण्यात येणारी मोफत ५ ब्रास वाळू अद्यापही मिळालेली नसल्याने त्यांची घरकुल बांधकामे रखडली आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे श्रीरामपूर तालुका सोशल मीडिया सेलचे संयोजक पत्रकार संदीप आसने यांनी तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन प्रलंबित लाभार्थ्यांना तात्काळ वाळू उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

आसने यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, यापूर्वीही या संदर्भात पाठपुरावा करण्यात आला होता. त्यावेळी नदीपात्रात पाणी असल्यामुळे वाळू उपसा व वाहतुकीस अडचणी येत असल्याचे प्रशासनाकडून कळविण्यात आले होते. मात्र सध्या नदीपात्रांमध्ये पाणी नसल्याने वाळू उपसा व वाहतुकीस कोणतीही अडचण राहिलेली नाही.असे असतानाही अनेक पात्र घरकुल लाभार्थ्यांना शासनाच्या नियमानुसार मिळणारी मोफत वाळू मिळालेली नसल्याने त्यांची बांधकामे अर्धवट अवस्थेत आहेत. परिणामी लाभार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून शासनाच्या घरकुल योजनेच्या उद्दिष्टपूर्तीलाही विलंब होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती, महसूल यंत्रणा व संबंधित विभागांना आवश्यक सूचना देऊन ज्या लाभार्थ्यांना अद्याप वाळू मिळालेली नाही, त्यांना प्राधान्याने मोफत ५ ब्रास वाळूचा पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायतींकडून प्रलंबित लाभार्थ्यांची यादी मागवून नियोजनबद्ध पद्धतीने वाळू वितरणाची कार्यवाही करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर विभाग तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीरामपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी देण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# ब्राम्हणीत कर्जमाफी अध्यादेशाची होळी; तुकाराम मुंडेंच्या प्रतिमेस दुग्धभिषेक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**उंबरे :** राज्य सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या शेतकरी कर्ज माफी अध्यादेशाची ब्राम्हणीतील शेतकऱ्यांनी काल शुक्रवार दि. ५ मे रोजी सकाळी होळी केली.

कर्जमाफी आम्हास मान्य नसून सरकारने कर्ज माफीचा निर्णय घेताना बहुतांश शेतकऱ्यांवर अन्याय केला आहे. या निषेधार्थ शेतकरी संघटनेचे नेते ड.अजित काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जमाफी अध्यादेश होळी करत राज्य सरकारच्या निर्णयाचा निषेध केला. यावेळी रविंद्र हापसे

शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संजय मोकाटे,विश्वनाथ हापसे सर आदींनी मनोगत व्यक्त करून सरकारच्या चुकीच्या निर्णयाचा निषेध केला. अन्न औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या सुरू असलेल्या धडाकेबाज कारवाईचे कौतुक करण्यात



आले.सरकारने तुकाराम मुंडे यांची काही काळासाठी साखर आयुक्तपदी नियुक्ती करावी..अशी मागणी करण्यात येवून चांगल्या कामाबद्दल तुकाराम मुंडे यांच्या प्रतिमेस दुध अभिषेक करण्यात आला.यावेळी शेतकरी संघटना ब्राम्हणी शाखेचे अध्यक्ष संजय मोकाटे,राजेंद्र राजदेव,तुळशीराम तारडे,विश्वनाथ हापसे,बापूसाहेब तारडे, संभाजी हापसे सोमाकांत कचरू राजदेव,बाबासाहेब मोकाटे,बाळासाहेब जाधव,अमोल मोकाटे, कृष्णा राजदेव,सकाहरी कचरू गायकवाड, दीपक पटारे,जालिंदर राजदेव,संजय गायकवाड,संजय हापसे,अजित तारडे,संभाजी हापसे,बाबासाहेब हापसे,संभाजी ठूबे,सोपान काचोळे,निवृत्ती तारडे, राजाबाबू हापसे,उमाकांत हापसे,बापूसाहेब हापसे, दत्तात्रय तारडे आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने आदी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप योजना सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** तालुक्यातील पशुपालक आणि शेतकऱ्यांना वर्षभर दर्जेदार हिरवा चारा उपलब्ध व्हावा तसेच जनावरांच्या वैरणीचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागावा, यासाठी आमदार अमोल खताळ यांच्या पुढाकारातून प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप योजना सुरू करण्यात आली आहे. पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागामार्फत ही योजना राबविण्यात येत असून पात्र शेतकऱ्यांना त्याचा लाभ दिला जाणार आहे.

बदलत्या हवामानामुळे शेती व पशुपालन व्यवसायासमोर विविध आव्हाने निर्माण झाली आहेत. अनियमित पाऊस, वाढते तापमान आणि चाऱ्याची कमतरता यामुळे पशुधनाच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर पौष्टिक आणि




मुबलक हिरव्या चाऱ्याच्या उत्पादनाला चालना देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना वैरण पिकांच्या बियाण्यांचे वितरण करण्यात येणार असून त्यातून स्वतः च्या शेतात चारा उत्पादन वाढविणे शक्य होणार आहे. त्यामुळे वर्षभर हिरवा चारा उपलब्ध राहून पशुपालकांच्या खर्चात बचत होण्यास मदत होणार आहे.योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संगमनेर पंचायत समितीच्या पशुसंवर्धन कार्यालयाशी किंवा तालुक्यातील २४ पशुसंवर्धन दवाखान्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी पुंडलिक येवले यांनी केले आहे.

आमदार अमोल खताळ यांनी सांगितले की, हिरव्या चाऱ्याची टंचाई दूर करून पशुधनाचे आरोग्य सुधारण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार असून जास्तीत जास्त शेतकरी व पशुपालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

# अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरतील : पवळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** महाराष्ट्र राज्य शिव-पाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शेतरस्ते, अतिक्रमण निर्मूलन, मोजणी प्रक्रिया सुलभ करणे तसेच राज्यभर मिशन झिरो पेंडन्सी अभियान प्रभावीपणे राबविण्यासंदर्भात २३ कलमी निवेदन सादर करण्यात आले. यावेळी मुख्य महसूल सचिवांकडे राज्यभरातील शेकडो प्रलंबित शेतरस्ता प्रकरणांचे पुरावे व कागदपत्रे सादर करून तातडीने कार्यवाहीची मागणी करण्यात आली.

राज्यातील शेवटच्या गरजवंत शेतकरी भावाला हक्काचा व दर्जेदार शेतरस्ता मिळेपर्यंत आमचा संघर्ष सुरू राहील.शासनाने प्रलंबित प्रकरणांवर तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना न्याय द्यावा. अन्यथा लाखोंच्या संख्येने शेतकरी रस्त्यावर उतरून राज्यव्यापी आंदोलन छेडतील. असा इशारा पवळे यांनी दिला.शेतकऱ्यांच्या हक्काच्या शेतरस्त्यांसाठी सुरू असलेल्या या लढ्याला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत असून, प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासनाने ठोस व कालबद्ध कार्यवाही करावी,अशी मागणी यावेळी करण्यात आली.



यावेळी महाराष्ट्र राज्य शिव-पाणंद शेतरस्ता चळवळीचे नेते शरद पवळे, रविंद्र खुडे, शिवाजी राऊत, नाथाभाऊ शिंदे, बाळासाहेब थोरात, दशरथ खापरे, सुरेश वाटपाडे, पोपट शेळके, नानाजी शिंदे, गंगाधर वलवे, अशोक कचरे, विठ्ठल निर्मळ, शांताराम पानमंद, सुरेश भुजबळ, रामहरी बोम्बे, अशोक जाधव, दशरथ वाळूंज, संजय साबळे, भाऊसाहेब वाळूंज, बबन गुंड यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संख्येने मंत्रालयात उपस्थित होते.

## पान १ वरुन

### ५.१५ लाख कोटींच्या कथित आर्थिक गैरव्यवहारामुळे खळबळ

पडताळणी झालेली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. काही गुंतवणूक व्यवहार आणि आर्थिक नोंदींबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या प्रकरणातील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे एलआयसीची कंपनीतील मोठी भागीदारी. एलआयसीमध्ये गुंतलेला निधी हा सर्वसामान्य नागरिकांच्या विमा हप्त्यांमधून जमा झालेला असल्याने या गुंतवणुकीच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. रोहित पवार यांनीही आपल्या प्रतिक्रियेत जनतेच्या पैशाचे संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधित संस्थांवर असल्याचे म्हटले आहे. दरम्यान, राजेश एक्स्पोर्ट्स आणि राजेश मेहता यांनी सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. कंपनीने आपले आर्थिक व्यवहार नियमांनुसार असल्याचा दावा केला असून तपास यंत्रणांना पूर्ण सहकार्य केले जाईल, असे स्पष्ट केले आहे. या प्रकरणामुळे सेबी, लेखापरीक्षक, स्वतंत्र संचालक आणि मोठ्या वित्तीय संस्थांच्या देखरेखीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अंतिम तपास अहवाल आणि पुढील कायदेशीर प्रक्रियेनंतरच या आरोपांची सत्यता स्पष्ट होणार असली, तरी सध्या हे प्रकरण देशातील सर्वात चर्चेच्या आर्थिक घडामोडींमध्ये गणले जात आहे.

दरम्यान, संबंधित कंपनीविरोधातील आरोप प्राथमिक स्वरूपाचे असून अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. कंपनीने सर्व आरोप नाकारले आहेत.

......................

### जिममधील तरुणांना प्रोटीनच्या नावाखाली गुंगीकारक इंजेक्शन विक्रीचा डाव उधळला

असून जिममध्ये व्यायाम करणाऱ्या तरुणांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.दि. ४ जून २०२६ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पाथर्डी पोलिसांनी अन्न व औषध प्रशासन विभागासह संयुक्त कारवाई केली. या पथकात पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विशाल लहाने, सहाय्यक फौजदार विलास जाधव, पोलीस कॉन्स्टेबल इजाज सय्यद, संजय जाधव, ज्ञानेश्वर इलग,सागर बुधवंत, सचिन हाडके, प्रविण भोजे,आप्पासाहेब तांबे तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाचे औषध निरीक्षक शेख जावेद हुसेन सहभागी होते. या पथकाने पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील चौफुली परिसरात संशयास्पद हालचाली करणाऱ्या एका युवकाची तपासणी केली. त्यावेळी त्याच्याकडे असलेल्या पिशवीतून मेफेन्टरमाईन सल्फेट इंजेक्शनच्या आठ सीलबंद बाटल्या आढळून आल्या. सुरुवातीला संबंधित युवकाने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र पोलिसांनी विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव शेरु राजू शेख (वय २५, रा. इंदिरानगर, पाथर्डी) असे सांगितले. चौकशीदरम्यान शेरु शेख याने ही औषधे अहिल्यानगर येथील मुकुंदनगर परिसरातील मोहसिन शेख याच्याकडून खरेदी केल्याची माहिती दिली. ही औषधे व्यायामशाळेत जाणाऱ्या तरुणांना तसेच इतर ग्राहकांना स्नायूवर्धक औषध अथवा प्रोटीन असल्याचे भासवून विक्री करण्याचा त्याचा उद्देश असल्याचे तपासात समोर आले आहे. वैद्यकीय सल्ल्याशिवाय व वैध डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय ही औषधे विक्रीसाठी आणण्यात आल्याचेही उघड झाले.या संदर्भात अन्न व औषध प्रशासन विभागाचे औषध निरीक्षक शेख जावेद हुसेन यांना पाथर्डी पोलिसांनी माहिती दिली. त्यांनी पोलिस ठाण्यात येऊन औषधांची तपासणी केली असता संबंधित इंजेक्शन हे 'एच' प्रवर्गातील औषध असल्याचे स्पष्ट झाले. अशा प्रकारची औषधे डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय विक्री करता येत नाहीत. तसेच त्यांचा अयोग्य वापर मानवी आरोग्यास गंभीर धोका निर्माण करू शकतो, असेही त्यांनी नमूद केले.या कारवाईत २ हजार ५०४ रुपये किमतीच्या इंजेक्शनच्या आठ बॉटल, ५० हजार रुपये किमतीचा ॲपल कंपनीचा भ्रमणध्वनी आणि १० हजार रुपये किमतीचा विवो कंपनीचा भ्रमणध्वनी असा एकूण ६२ हजार ५०४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तपासणीसाठी चार कुप्यांचे नमुने सीलबंद करून ताब्यात घेण्यात आले असून उर्वरित कुप्या पोलिसांच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत. या प्रकरणी शेरु राजू शेख याच्यासह मोहसिन शेख (रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहसिन शेख सध्या फरार असून त्याचा शोध सुरू आहे. पुढील तपास पाथर्डी पोलीस करीत आहेत.

### दरोड्यातीलआरोपीचा पोलिसांवर गोळीबार

पोलिसांनी सापळा रचून आरोपीला शरण येण्याचे आवाहन केले. मात्र आरोपी पावलस गायकवाड याने पोलिसांचे आदेश धुडकावून लावत त्याने थेट पोलीस पथकाच्या दिशेने गोळीबार केला. ही गोळी पो. कॉ. बटुळे यांच्या अगदी जवळून गेल्याने मोठी दुर्घटना टळली. यानंतर पोलिसांनी आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला असता त्याने घरासमोर उभी असलेली पांढऱ्या रंगाची एक्सयूव्ही कार घेतली आणि आपल्या साथीदारांसह भरधाव वेगाने बीडच्या दिशेने पलायन केले.घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू, पोलिस निरीक्षक विलास पुजारी हे आपल्या पोलीस पथकांसह तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथकांना सूचना दिल्या. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पावलस उर्फ मेहेर कचरू गायकवाड व त्याच्या दोन ते तीन अनोळखी साथीदारांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांवर गोळीबार करून फरार झालेल्या आरोपीचा शोध घेण्यासाठी सोलापूर व अहिल्यानगर पोलिसांची संयुक्त मोहीम सुरू असून आहे.

### राष्ट्रवादीचे नगरसेवक रिजवान शेख यांचे जात प्रमाणपत्र रद्द

करून जात दावा सिद्ध न झाल्याचा निष्कर्ष नोंदविला. समितीच्या तीन सदस्यीय खंडपीठाने एकमताने हा निर्णय दिला असून आदेशाविरुद्ध संबंधितांना उच्च न्यायालयात दाद मागण्याचा पर्याय उपलब्ध आहे.या निर्णयानंतर शेवगावच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून पुढील कायदेशीर आणि राजकीय घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

## राज्य सरकारने केलेल्या कर्जमाफीचे श्रेय पुणतांबेकरांच्या आंदोलनाच : डॉ धनवटे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** राज्य सरकारने नुकतीच शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी जाहिर केली त्याचे श्रेय पुणतांबा येथील शेतकऱ्यांनी १ जून २०१७ रोजी केलेल्या शेतकरी संपाच्या अनोख्या आंदोलनास जाते असे प्रतिपादन शेतकरी संपाच्या आंदोलनातील प्रमुख शिलेदार डॉ. धनंजय धनवटे यांनी केले आहे. शेतकरी संपाच्या आंदोलनास नुकतेच ९ वर्षे पूर्ण झाल्या बद्दल त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली पुणतांबा येथील शेतकरी वर्गाने संघटित होऊन आपल्या न्याय मागण्यासाठी शेतकरी संपा सारखे अनोखे आंदोलन रसत्यावर उतरून तसेच बाजारपेठेत दूध शेतीमाल न पाठविता नुकसान सहन करून शांततेने आंदोलन केले.

विशेष म्हणजे ह्या आंदोलनाचे नेतृत्व सर्वसामान्य शेतकऱ्यांकडे होते. या अभिनव आंदोलनाला संपूर्ण राज्यात चांगला प्रतिसाद मिळाला तात्कालिक मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस ह्यांनी या आंदोलनाची तातडीने दखल घेतली व २०१७मध्ये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंर्तगत शेतकऱ्यांचे दीड लाख रुपयापर्यंत तातडीने कर्जमाफी केली २०१९ मध्येही राज्य सरकारने महात्मा ज्योतीबा फुले शेतकरी कर्जमुक्ती अंर्तगत २ लाखापर्यंत कर्जमाफी करण्यात आली होती चार दिवसा पूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने राज्यातील ५५ लाख ७२ हजार शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंर्तगत अंदाजे ३६५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी केली आहे.

## जागतिक पर्यावरण दिनी श्रीराम साधना आश्रमात महंत श्री सुनीलगिरी महाराजांच्या हस्ते वृक्षारोपण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील मुकींदपूर येथील चारी क्रमांक तीन जवळ असलेल्या रामनगर येथील श्रीराम साधना आश्रमाध्ये जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आश्रम प्रांगणात महंत श्री सुनीलगिरी महाराज यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येऊन पर्यावरणाच्या संवर्धनाचा संदेश देण्यात आला

यावेळी झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रम प्रसंगी महंत श्री सुनीलगिरी महाराजांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येऊन वृक्षांची पूजा करण्यात आली. वाढते तपमान लक्षात घेता आजच्या काळात ठीकठिकाणी वृक्ष लागवड करणे ही काळाची गरज झाली असल्याने समाजातील प्रत्येक घटकांनी व सामाजिक संघटनेने



वृक्षारोपण मोहीम हाती घेऊन वृक्ष लागवड चळवळ निर्माण करावी असे आवाहन महंत श्री सुनीलगिरी महाराजांनी यावेळी बोलतांना केले.

यावेळी झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रम प्रसंगी साध्वी सुवर्णादीदी चैतन्य,वृक्ष संवर्धन समितीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, मक्तापूर बाळासाहेब बर्डे पाटील, हंडीनिमगावचे दिपक कनगरे यांच्यासह सेवेकरी मंडळी उपस्थित होते.यावेळी पत्रकार सुनील कर्डिले यांनी ६ नारळ ५ केशर आंबा असे एकूण ११ वृक्ष श्रीराम साधना आश्रमाला भेट दिली

यावेळी महंत सुनिलगिरी महाराज यांनी वृक्षारोपण करण्याचे महत्त्व पटवून दिले तर साध्वी सुवर्णा दीदींनी निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण गरजेचे असल्याचे सांगितले. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने दरवर्षी मंदिर प्रांगणात वृक्षारोपण केले जाते या उपक्रमाचे हे पाचवे वे वर्ष होते. संत तुकाराम महाराज यांनी वृक्षवल्ली आम्हा सोयरे म्हटलेले असल्याने वृक्ष लागवडीसाठी यावेळी जनजागृती करण्यात आली.

## प्रदुषण टाळण्यासाठी प्रत्येकाने एक झाड लावावे : डॉ. रोहित कुलकर्णी




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** एकीकडे देश प्रगत होत असताना दुसऱ्या बाजूला पर्यावरणाची हानी होत आहे प्रदूषणाचे वाढते प्रमाण ही आपल्याला धोक्याची घंटा आहे वेळी सावध झालो नाही तर येणारी पिढी ही आपल्याला कधीही माफ करू शकत नाही असे प्रतिपादन कारेगावचे प्रथित यश डॉ. रोहित कुलकर्णी यांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आपल्या प्रमुख उपस्थितीच्या भाषणात केले.

लेट एकनाथ नामदेव गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. भाऊसाहेब टेमक साहेब व ॲड सुरेखा टेमक श्र यांच्या मार्गदर्शनाखाली आज जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारगाव येथील रहिवासी प्रथित यश डॉ. रोहित कुलकर्णी हे होते. डॉ. कुलकर्णी हे एक शेतकरी कुटुंबातील असल्याने त्यांनी सेंद्रिय शेतीचे महत्व आपल्या आरोग्यासाठी किती चांगले आहे हे समजावून सांगितले यानंतर शाळेच्या प्राचार्या कुदळे मॅडम यांनी आपल्या भाषणातून पर्यावरण दिनानिमित्त माहिती सांगितली ,कार्यक्रमाच्या शेवटी पाहुण्यांच्या हस्ते व पालकांच्या हस्ते शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांनी स्वरा बोरुडे हिने केले तर आभार प्रदर्शन वर्षा मगर यांनी केले

## भंडारदऱ्याच्या आवर्तनाचे नियोजन करा : औताडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

शिरसगाव : हवामान खात्याने यंदा मान्सून उशिरा दाखल होण्याचा अंदाज व्यक्त केल्याने भंडारदरा धरणाच्या उन्हाळी आवर्तन क्रमांक २ चे नियोजन तातडीने करून ८ ते ९ जून २०२६ दरम्यान आवर्तन सुरू करण्यात यावे, अशी मागणी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे यांनी केली आहे. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात औताडे यांनी म्हटले आहे की, गेल्या दोन वर्षांपासून भंडारदरा सिंचन प्रणालीचे नियोजन शेतकरी संघटना व शेतकऱ्यांच्या मागणीनुसार योग्य पद्धतीने करण्यात आल्याने हक्काच्या पाटपाण्यासाठी कोणत्याही प्रकारची आंदोलने करण्याची वेळ आली नाही. यंदाच्या हंगामात खरीप, रब्बी-१, रब्बी-२ आणि उन्हाळी-१ अशी आवर्तने पूर्ण झाली असून सध्या धरणात सुमारे साडेसहा टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे उन्हाळी-२ आवर्तन तातडीने दिल्यास भंडारदरा सिंचन प्रणालीच्या कार्यक्षेत्रातील ऊस, भाजीपाला व चारा पिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले. नाशिक ते जायकवाडी दरम्यानचा गोदावरी नदीकाठचा परिसर पर्जन्यछायेच्या प्रदेशात येत असल्याने जून, जुलै आणि ऑगस्ट महिन्यांत सुरुवातीच्या काळात कमी पाऊस पडतो. त्यामुळे अल्प पर्जन्यमानामुळे विहिरी व बोअरवेलच्या पाणीपातळीत वाढ होत नाही. परिणामी पावसाळ्यातही बागायती पिकांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत नसल्याचे औताडे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, उन्हाळी-१ आवर्तनासाठी नमुना क्रमांक ७ चे पाणी अर्ज भरू न शकलेल्या शेतकऱ्यांना उन्हाळी-२ आवर्तनासाठी संधी देण्यात यावी. कालवा निरीक्षकांनी संबंधित अर्ज भरून घेऊन शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून द्यावे. अर्ज न भरल्याचे कारण पुढे करून शेतकऱ्यांना वेठीस धरू नये किंवा अनधिकृत मार्गाने पैशांची मागणी करू नये, असा इशाराही त्यांनी दिला. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष अनिल औताडे, तालुकाध्यक्ष युवराज जगताप, उपजिल्हाध्यक्ष हरिभाऊ तूवर, डॉ. दादासाहेब आदिक यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME VISHAL PRADIP TORANE ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS VISHAL PRADEEP TORANE (AADHAR NO. 799639149091) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE: SHRIRAMPUR DATE : 05/06/2026

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME IN MY HUSBAND PASSPORT NAYYARAKHATUN MAULANA MOHAMMAD IMDADALI RIZVI (PASSPORT NO.N7550306) ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS NAYYARAKHATUN MOHAMMADIMDADALI MOMIN (AADHAR NO. 5502 1759 7814) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE: SHRIRAMPUR DATE : 05/06/2026

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MYOLD NAME 1) MOHAMMAD IMDADALI RIZVI MAULANA (PASSPORT NO.N7550306) IN MY WIFE PASSPOR 2) IMDADALI QUEMRUDDIN RIZVI (PASSPORT NO.H9010932) ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS MOHAMMADIMDADALI KAMRUDDIN MOMIN (AADHARNO. 9360 0527 3594) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE: SHRIRAMPUR DATE : 05/06/2026

## 'एक वृक्ष, एक जीवन' संदेश देत नारायणपूरमध्ये वृक्षारोपण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नारायणपूर ग्रामपंचायतीच्या वतीने गावात विविध प्रजातींच्या शंभर वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमाचा शुभारंभ गटविकास अधिकारी सुहास वाकचौरे यांच्या हस्ते करण्यात आला.

गंगापूर तालुक्यातील नारायणपूर ग्रामपंचायतीचे सरपंच तथा प्रशासक नाशेर पटेल यांच्या आदेशान्वये उपसरपंच माजीद शेख व ग्रामपंचायत अधिकारी स्वप्निल घरमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. गावातील ग्रामपंचायत परिसर, सार्वजनिक ठिकाणे तसेच मोकळ्या जागांमध्ये विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

_यावेळी विस्तार अधिकारी




अशोक घोडके, ग्रामपंचायत सदस्य दीपक खरात, बिस्मिल्लाबी नाशेर शेख, हुजरा बी लाल शेख, निलोफर राऊफ शेख, तमिजबी अजीज शेख, सोफिया युनूस शेख, हरिसिंग काळुसिंग मुळे, पोलीस पाटील, ताजोद्दीन शेख, इकोसत्वचे प्रतिनिधी महादेव चांदगुडे, यश भंडारे, समाधान गलांडे, आरोग्य सेवक अनिल सोनवणे, आरोग्य सेविका पुष्पलता जाधव, अंगणवाडी सेविका सविता गायकवाड तसेच ग्रामपंचायत कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सरपंच तथा प्रशासक नाशेर पटेल म्हणाले, ''नारायणपूर गाव अधिक हिरवेगार व पर्यावरणपूरक करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून यापुढेही विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. वृक्षांमुळे शुद्ध व मोकळी हवा मिळण्यास मदत होते, पर्यावरणाचा समतोल राखला जातो आणि भविष्यातील पिढ्यांसाठी निरोगी वातावरण निर्माण होते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करण्यासाठी पुढाकार घ्यावा.''कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी वृक्षांचे संवर्धन व संगोपन करण्याचा संकल्प केला. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती होण्यास मदत झाली असून हरित नारायणपूरच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

## बऱ्हाणपुर गावांमध्ये पर्यावरण दिन साजरा करुन वृक्षारोपण केले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चांदा :** मुळा एजुकेशन सोसायटी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत सोनई येथील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी ग्रामीण जागरूकता व कृषी कार्यानुभव अंतर्गत नेवासा तालुक्यातील बऱ्हाणपूर येथे या कृषी कन्यांनी पर्यावरण दिन साजरा केला.

शुक्रवार दि.५ जून रोजी कृषीकन्यांनी गावांमध्ये पर्यावरण दिनाचे महत्त्व उपस्थित शेतकरी व ग्रामस्थ यांना पटवून दिले. या कृषी कन्यांना प्राचार्य डॉ हरी मोरे , उपप्राचार्य सुनील बोरुडे,कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ दिशा चव्हाण, प्रा.नरेंद्र दहातोंडे, डॉ. संतोष चौघुले व कार्यक्रम समन्वयक अनुप दरंदले यांचे



विशेष मार्गदर्शन मिळाले.

या वेळी सोनई कृषी महाविद्यालयाच्या कृषिकन्या काळभोर पौर्णिमा,भांबुरे साक्षी,प्रतिक्षा गोडसे,हिमांशी गवळी,आर्द्रा नायर यांनी गावकऱ्यांसोबत बकुळीची दोन व आंब्याचे एक झाड लावले. या दिनानिमित्त अशोक चव्हाण, ॲड. बाळासाहेब चव्हाण, दिपक चव्हाण व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच या निमित्ताने लहान मुलांसाठी चित्रकाला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

## ओझर खुर्द येथे प्रवरा कृषीदूतांचे आगमन; शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे मार्गदर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** संगमनेर तालुक्यातील ओझर खुर्द येथे कृषी महाविद्यालय, लोणीच्या कृषीदूतांचे आगमन झाले असून ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्नित कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत गावात दाखल झाले आहेत. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, कृषी शिक्षण संचालक डॉ. उत्तमराव कदम, प्राचार्य डॉ. अमोल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कार्यक्रम समन्वयक डॉ. रमेश जाधव, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप व प्रा. अक्षया वाळुंज यांच्या सूचनेनुसार प्रथमेश क्षिरसागर, सुदर्शन बडे, राहुल कांबळे, भाऊसाहेब चव्हाण व तुषार बिबे हे कृषीदूत शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. कृषीदूत शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, कीड व रोग ओळख, एकात्मिक व्यवस्थापन तसेच विविध प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी सरपंच गिरीजा साबळे, उपसरपंच दगडू शेपाळ यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामीण भागातील कृषी समस्या समजून घेऊन त्यावर उपाय सुचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात येणार आहे.

## निधन वार्ता

### बाळासाहेब यादव



**शिरसगाव :** येथील बाळासाहेब यमाजी यादव यांचे वयाच्या ७० व्या वर्षी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे आई, पत्नी, दोन भाऊ, दोन बहिणी, तीन पुतणे, तीन पुतण्या असा परिवार आहे. इंदिरानगर येथील श्रीदत्त मंदिराचे प्रमुख बाबासाहेब यादव आणि शरद यादव यांचे मोठे बंधू होते.

## ड्रोन प्रशिक्षण मार्गदर्शन शिबिर उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर:** कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी आणि युवकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या ड्रोन प्रशिक्षण मार्गदर्शन शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ४ जून रोजी शिऊर येथील जीवन विकास महाविद्यालयात तसेच ५ जून रोजी वैजापूर येथील जे. के. जाधव महाविद्यालयात हे शिबिर पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. जे. के. जाधव होते. यावेळी स्मार्ट इंडिया इन्स्टिट्यूटचे संचालक बिपीन लासुरे, तेजश्री लासुरे, संचालक धन्नालाल चुडीवाल, प्राचार्य सानप, माजी जिल्हा परिषद सदस्य सुनील पैठणपगारे, प्रशासकीय अधिकारी शेखर देशमुख, सुनील सूर्यवंशी,प्राचार्य भिंगारदेव, चव्हाण,सूर्यकांत जोरवेकर, माधुरी दिवे, ओम कोल्हे, चंद्रशेखर कदम, उज्वल पुरोहित,शिरीष चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना ड्रोन तंत्रज्ञानाचे महत्त्व, शेतीमधील त्याचा वाढता वापर, भविष्यातील करिअरच्या संधी, प्रशिक्षणाची रचना तसेच प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत उपलब्ध सुविधांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून प्रशिक्षणाविषयी माहिती जाणून घेतली.

ड्रोन प्रशिक्षणास ८ जूनपासून वैजापूर येथील आयटीआयमध्ये सुरुवात होणार असून प्रशिक्षणाचा कालावधी तीन महिन्यांचा आहे. १८ ते ३५ वयोगटातील तसेच बारावी उत्तीर्ण व अनुत्तीर्ण युवकांना या प्रशिक्षणाचा लाभ घेता येणार आहे. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना विद्यावेतनही देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**शनिवार दि . ६ जून २०२६**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १६० २५० ७०० | ७-४ | १३० १४९ ४०० | जोड ७६-१४-३२-८०-४५ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२० ६७० ५८० | ३-६ | १२३ २६८ ६०० | जोड ३२-०८-१४-७५-६९ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४० २३० ३८० | ५-८ | १२५ २६० ४४० | जोड ५१-२८-३४-७९-८० |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 09/03/2026 | 2 | | 2 | 1 | | 8 | 5 | | 8 | 2 | | 1 | 3 | | 1 |
| To | 3 | 16 | 4 | 6 | 56 | 8 | 7 | 05 | 8 | 4 | 43 | 4 | 3 | 09 | 3 |
| 13/03/2026 | 6 | | 0 | 8 | | 0 | 8 | | 9 | 8 | | 8 | 4 | | 5 |
| 16/03/2026 | 4 | | 8 | 2 | | 3 | 4 | | 4 | 1 | | 1 | 6 | | 3 |
| to | 5 | 56 | 9 | 0 | 21 | 8 | 6 | 02 | 9 | 2 | 02 | 3 | 7 | 38 | 7 |
| 20/03/2026 | 6 | | 9 | 0 | | 0 | 0 | | 9 | 7 | | 8 | 0 | | 8 |
| 23/03/2026 | 6 | | 3 | 4 | | 1 | 5 | | 7 | 1 | | 2 | 3 | | 1 |
| to | 8 | 34 | 5 | 5 | 46 | 7 | 6 | 03 | 8 | 3 | 46 | 4 | 3 | 64 | 6 |
| 27/03/2026 | 9 | | 6 | 5 | | 8 | 9 | | 8 | 0 | | 0 | 0 | | 7 |
| 30/03/2026 | 2 | | 1 | 1 | | 1 | 2 | | 1 | 1 | | 1 | 1 | | 2 |
| to | 8 | 90 | 3 | 3 | 87 | 6 | 7 | 97 | 1 | 1 | 12 | 5 | 6 | 66 | 5 |
| 03/04/2026 | 9 | | 6 | 4 | | 0 | 0 | | 9 | 9 | | 6 | 9 | | 9 |
| 06/04/2026 | 1 | | 2 | 1 | | 7 | 1 | | 4 | 3 | | 1 | 1 | | 4 |
| to | 3 | 70 | 2 | 4 | 02 | 7 | 3 | 98 | 7 | 5 | 82 | 5 | 2 | 78 | 6 |
| 10/04/2026 | 3 | | 6 | 5 | | 8 | 5 | | 7 | 0 | | 6 | 4 | | 8 |
| 13/04/2026 | 5 | | 1 | 1 | | 6 | 2 | | 5 | 1 | | 8 | 2 | | 1 |
| to | 6 | 06 | 5 | 4 | 43 | 7 | 3 | 45 | 0 | 3 | 77 | 9 | 6 | 85 | 4 |
| 17/04/2026 | 9 | | 0 | 9 | | 0 | 9 | | 0 | 3 | | 0 | 0 | | 0 |
| 20/04/2026 | 5 | | 1 | 8 | | 4 | 1 | | 3 | 5 | | 3 | 3 | | 3 |
| to | 7 | 00 | 2 | 8 | 58 | 5 | 2 | 53 | 5 | 5 | 71 | 8 | 4 | 68 | 7 |
| 24/04/2026 | 8 | | 7 | 9 | | 9 | 2 | | 5 | 7 | | 0 | 9 | | 8 |
| 27/04/2026 | 3 | | 1 | 4 | | 7 | 1 | | 1 | 6 | | 1 | 6 | | 2 |
| to | 5 | 63 | 2 | 4 | 85 | 8 | 6 | 71 | 2 | 7 | 29 | 9 | 8 | 27 | 5 |
| 01/05/2026 | 8 | | 0 | 0 | | 0 | 0 | | 8 | 9 | | 9 | 8 | | 0 |
| 04/05/2026 | 1 | | 3 | 1 | | 6 | 2 | | 2 | 2 | | 2 | 2 | | 2 |
| to | 7 | 71 | 9 | 4 | 34 | 8 | 3 | 48 | 7 | 4 | 25 | 5 | 4 | 66 | 5 |
| 08/05/2026 | 9 | | 9 | 8 | | 0 | 9 | | 9 | 6 | | 8 | 0 | | 9 |
| 11/05/2026 | 5 | | 2 | 3 | | 2 | 6 | | 2 | 1 | | 1 | 4 | | 1 |
| to | 6 | 79 | 7 | 7 | 04 | 3 | 0 | 68 | 3 | 9 | 01 | 2 | 7 | 85 | 5 |
| 15/05/2026 | 6 | | 0 | 0 | | 9 | 0 | | 3 | 0 | | 8 | 7 | | 9 |
| 18/05/2026 | 8 | | 4 | 5 | | 1 | 1 | | 1 | 7 | | 4 | 2 | | 2 |
| to | 9 | 79 | 5 | 6 | 96 | 7 | 4 | 22 | 2 | 8 | 30 | 8 | 8 | 93 | 5 |
| 22/05/2026 | 0 | | 0 | 8 | | 8 | 7 | | 9 | 8 | | 8 | 9 | | 6 |
| 25/05/2026 | 5 | | 2 | 3 | | 1 | 8 | | 4 | 1 | | 2 | 4 | | 5 |
| to | 6 | 11 | 9 | 4 | 37 | 3 | 9 | 78 | 6 | 9 | 05 | 5 | 6 | 06 | 5 |
| 29/05/2026 | 0 | | 0 | 6 | | 3 | 0 | | 8 | 0 | | 8 | 0 | | 6 |
| 01/06/2026 | 4 | | 1 | 9 | | 1 | 2 | | 5 | 1 | | | | | |
| to | 4 | 89 | 3 | 9 | 80 | 2 | 6 | 82 | 7 | 2 | 1 | | | | |
| 05/06/2026 | 0 | | 5 | 0 | | 7 | 0 | | 0 | 8 | | | | | |

द•ख•ल

## आज शनिवार ०६ जुन रोजी सुरमई शाम संगीत कार्यक्रम



**अहिल्यानगर :** मनोज कुमार प्रस्तुत आज शनिवार ०६ जुन रोजी सायंकाळी ६.३० वा.माऊली संकुल, सावेडी,अहिल्यानगर येथे सुरमई शाम संगीत कार्यक्रम,कराओके ट्रॅक शो आयोजित करण्यात आला आहे.यामध्ये मनोज डफळ आरती दिक्षित(पुणे)हे गाणे सादर करणार आहे.तर त्यांना साथ संजय भिंगारदिवे,भैरवनाथ अडागळे,बाळासाहेब शिंदे,बाबासाहेब जगताप हे करणार आहे तर उस्मान पाटणी(नाशिक) हे निवेदन करणार आहे. कार्यक्रम विनामूल्य असून कार्यक्रमाला सहकार्य वसंत पेंट,हर दिन मॉर्निंग ग्रुप,भिंगार,डॉ दमन काशीद हॉस्पिटल,मनपा कर्मचारी पतसंस्था,युनायटेड सिटी हॉस्पिटल,राज ग्राफिक्स,जगताप मल्टी सर्विसेस,भाग्यश्री जन्म कुंडली यांनी केले आहे.तरी संगीतप्रेमींनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आली.

# अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील ३०० कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर : जिल्हा पोलीस दलातील चालू वर्षातील सुमारे ३०० पोलीस कर्मचार्यांच्या प्रशासकीय बदल्या गुरूवारी (४ जून) पोलीस मुख्यालयात पार पडल्या. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी आयोजित केलेल्या बदली दरबारात प्रत्येक कर्मचार्याची भूमिका, गरज आणि पसंती जाणून घेत बदली प्रक्रिया राबविण्यात आली. या प्रक्रियेत काहींना मनासारखे पोलीस ठाणे मिळाल्याने आनंदाचे वातावरण होते, तर काहींना अपेक्षित ठिकाण न मिळाल्याने नाराजी आणि भावनिक क्षणही पाहायला मिळाले.**

एका पोलीस ठाण्यात किंवा शाखेत सलग अथवा खंडित स्वरूपात पाच वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या कर्मचार्यांकडून यापूर्वी तीन पसंतीच्या ठिकाणांसह अर्ज मागविण्यात आले होते. बदलीपात्र कर्मचार्यांना गुरूवारी सकाळी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले होते. प्रत्येक अंमलदाराशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांची भूमिका जाणून घेतल्यानंतर बदलीचे आदेश देण्यात आले. सकाळी साडेआठ वाजता सुरू झालेल्या या प्रक्रियेला पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्यासह अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे उपस्थित होते.



बदली प्रक्रियेत प्रथम श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, सहायक फौजदार आणि पोलीस हवालदार यांच्या बदल्या करण्यात आल्या. गुन्हे तपासाची जबाबदारी असलेल्या या अंमलदारांपैकी अनेक जण गेल्या अनेक वर्षांपासून अहिल्यानगर शहर व परिसरातील पोलीस ठाण्यांमध्ये कार्यरत होते. त्यामुळे जिल्ह्याच्या उत्तर व दक्षिण भागातील काही पोलीस ठाण्यांमध्ये तपास अंमलदारांची कमतरता निर्माण झाली होती. ही तूट भरून काढण्यासाठी काही तपास अंमलदारांच्या बदल्या त्यांच्या पसंतीपेक्षा रिक्त जागांचा विचार करून करण्यात आल्या. मात्र, काही कर्मचार्यांना अपेक्षित पोलीस ठाणे न मिळाल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली.

काही महिला पोलिसांच्या डोळ्यांत अश्रूही दिसून आले. त्यानंतर पोलीस नाईक, पोलीस शिपाई आणि चालक यांच्या बदल्या करण्यात आल्या. या कर्मचार्यांच्या पसंतीचा मोठ्या प्रमाणावर विचार झाल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले.

दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेत (एलसीबी) बदली मिळावी, अशी अनेक कर्मचार्यांची इच्छा होती. अर्जातील पसंतीक्रमात एलसीबीचा समावेश असतानाही अधीक्षक सुदर्शन यांनी कोणालाही एलसीबीमध्ये बदली दिली नाही. त्यामुळे एलसीबीत जाण्याची अपेक्षा बाळगणार्या कर्मचार्यांचा हिरमोड झाला. काही पोलिसांनी विनंती बदल्यांसाठी अर्ज केले असले तरी त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. सध्या केवळ प्रशासकीय बदल्या करण्यात आल्या आहेत.

## एआयच्या गाण्यांमधून जनगणनेची जनजागृती



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांच्या निर्देशानुसार जनगणना २०२७ च्या जनजागृती मोहिमेला नवे आणि आधुनिक स्वरूप देत प्रगणक तथा जनगणना ब्रँड अँबेसिडर कवी डॉ. अमोल बागुल यांनी मराठी भाषेत जनगणनेवरील प्रेरणादायी गीतांचे लेखन करत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि चॅट जीपीटीच्या सहाय्याने या गीतांना सुरेल संगीत, आकर्षक ताल, लय आणि आधुनिक ध्वनिमुद्रणाची जोड देऊन गाणी तयार केली आहेत.

आले जनगणनेचे पर्व, सज्ज अहिल्यानगर सर्व, स्वगणना करूया चला, पावसातली जनगणना यांसारख्या गीतांसह सुमारे १० गाणी तयार करण्यात आली असून जनगणनेचा संदेश घराघरांत पोहोचविण्यासाठी विशेष रिंगटोन, जिंगल्स आणि ऑडिओ संदेश देखील विकसित केले आहेत,ही गाणी विविध रेडिओ चॅनेल, एफएम केंद्रे तसेच सोशल मीडियावरील विविध प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत असून नागरिकांकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या गीतांच्या किंवा आर कोड विमोचनाप्रसंगी आयुक्त श्री डांगे यांनी नमूद केले की संगीताच्या माध्यमातून जनगणनेचा संदेश प्रभावीपणे पोहोचत असल्याने नागरिकांमध्ये जनगणनेविषयी जागरूकता वाढत आहे.

परिणामी, प्रगणकांना अचूक माहिती संकलित करण्यासाठी अधिक सहकार्य मिळत असल्याचे दिसून येत आहे. यासाठी डॉ.बागुल यांना नागेंद्र मुतकेकर (अतिरिक्त आयुक्त),मेहेर लहारे( सहाय्यक आयुक्त), शहाजान तडवी- (प्र.उपायुक्त), राकेश कोतकर( जनगणना विभाग प्रमुख) तसेच बाळासाहेब पवार (प्रभाग अधिकारी),रफिक देशमुख,मास्टर ट्रेनर प्रा.संतोष देशमुख,पर्यवेक्षिका अलका दहातोंडे, यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.

## धारदार शस्त्रांचा धाक दाखवून कार चालकाला लुटले



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** निंबळक गावाच्या शिवारातील साईबन भागात दोन दुचाकींवरून आलेल्या चार अनोळखी चोरट्यांनी एका कार चालकाला धारदार शस्त्रांचा धाक दाखवून लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चार अज्ञात आरोपींविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सागर सिताराम तळेकर (वय ३९, रा. निर्मलनगर, सत्कार कॉलनी, अहिल्यानगर) हे रात्रीच्या सुमारास निंबळक शिवारातून आपल्या मारुती कारने घराकडे निघाले होते. दरम्यान, दोन विना नंबरच्या स्कुटीवरून आलेल्या चार अनोळखी इसमांनी त्यांची कार अडवली. चोरट्यांनी तळेकर यांना लोखंडी चाकू, कुऱ्हाड, धारदार कटर आणि कोयत्याचा धाक दाखवून त्यांच्या जवळील मुद्देमाल बळजबरीने चोरून घेतला.

या लुटीमध्ये चोरट्यांनी फिर्यादीच्या कानातील सोन्याची बाळी, गळ्यातील सोन्याचे बदाम, डिजिटल स्मार्ट घड्याळ आणि रोकड असा एकूण ३० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लुटून नेला. चोरी केल्यानंतर आरोपींनी तळेकर यांना पोलिसात गेल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. या भीतीमुळे फिर्यादीने तात्काळ तक्रार दिली नव्हती, मात्र मनस्थिती सुधारल्यानंतर त्यांनी पोलिसात धाव घेतली. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी आणि पोलीस उपनिरीक्षक जाधव करत आहेत.

## अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्यासाठी बीड ते मुंबई लॉग मार्च चे आयोजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

### समस्त आंबेडकरी समाज बैठकीस उपस्थित राहवे : बनसोडे

**अहिल्यानगर :** अनुसूचित जातीतील अन्यायकारक उपवर्गीकरण रद्द करण्याच्या प्रमुख मागणीसाठी बीड ते मंत्रालय, मुंबई दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या लॉंग मार्चच्या यशस्वी नियोजनासाठी रविवार दि. ७ जून २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता तारकपूर बसस्थानक शेजारील हॉटेल व्ही स्टार येथे कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीस लॉंग मार्चचे प्रमुख संयोजक सिद्धार्थजी शिनगारे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील प्रमुख कार्यकर्ते, विहार समितीचे सदस्य, सामाजिक, धार्मिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी तसेच भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणारे सुरेश बनसोडे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील समस्त आंबेडकरी समाजबांधव, कार्यकर्ते व भीमसैनिकांनी या महत्त्वपूर्ण बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपवर्गीकरणाविरोधातील लढ्यास बळ द्यावे, असे आवाहन केले आहे. तसेच आगामी लॉंग मार्चच्या नियोजनाबाबत महत्त्वपूर्ण चर्चा होणार असल्याने सर्वांनी वेळेत उपस्थित राहून आपल्या सूचना व मते मांडावीत, असेही त्यांनी नमूद केले.

या बैठकीत लॉंग मार्चची रूपरेषा, संघटनात्मक तयारी आणि विविध स्तरांवरील जनजागृती अभियानाबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

## वृक्ष हे केवळ पर्यावरणाचे रक्षक नसून भावी पिढ्यांसाठी अमूल्य : प्रा. विधाते

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी वर्षभर विविध उपक्रम राबविणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ऐतिहासिक चाँदबीबी महाल परिसरात वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि प्लास्टिकमुक्ती जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने घेण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. त्यानंतर डोफ्लगर परिसर व चाँदबीबी महाल परिसरात स्वच्छता अभियान राबवून प्लास्टिक व इतर कचरा संकलित करण्यात आला. पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या प्लास्टिकच्या वापराविरोधात जनजागृती करण्यात आली. विशेष म्हणजे लावण्यात आलेल्या प्रत्येक वृक्षाच्या संगोपन व संवर्धनाची जबाबदारी ग्रुपच्या सदस्यांनी स्वीकारली.

यावेळी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, राजू कांबळे, पवन वाघमारे, रमेश वराडे, जहीर सय्यद, सचिन चोपडा, सर्वेश सपकाळ, मेजर दिलीप ठोकळ, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, अविनाश पोतदार, अभिजीत सपकाळ, यशराज माने, मनोज मेहेर, सायकलपटू त्रिंबकराव नेटके, सचिन पेंढूरकर, दिलीप गुगळे, नवनाथ वेताळ, जालिंदर अळकुटे, रामनाथ गर्जे, दीपक धाडगे, मनोहर दरवडे, मुन्ना वाघस्कर, किरण फुलारी, प्रकाश देवळालीकर, दीपक घोडके, ड. उद्धव चिमटे, आराध्या परदेशी, सोहम चेमटे, सूर्यकांत कटोरे, यश भिंगारदिवे, रतनशेठ मेहेत्रे, सुधीर कपाळे, सखाराम अळकुटे, अविनाश जाधव, उत्तम वाघस्कर, दशरथराव मुंडे, प्रशांत भिंगारदिवे, राजू शेख, भारत कनोजिया, अजय झिंजे, आनंद दळवी, राकेश वाडेकर, सतीश काळे यांच्यासह अनेक पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

प्रा. माणिक विधाते म्हणाले की, पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज बनली आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा वाढता वापर यामुळे पर्यावरणासमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत.

# मावा व सुगंधी तंबाखू बनवणाऱ्या २ ठिकाणांवर छापे

### साडेतीन लाखाचा मुद्देमाल जप्त : दोघे ताब्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगर शहरातील तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या मावा व सुगंधी तंबाखू तयार करणाऱ्या दोन ठिकाणांवर एमआयडीसी पोलिसांनी धडक कारवाई करून छापे टाकले या छाप्यामध्ये सुमारे साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला याप्रकरणी तो घना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघा जणांना ताब्यात घेतले आहे नगर शहरात तंबाखूजन्य माव्याला मोठी मागणी असून चौका चौकात मावा विक्री खुलेआम चालू आहे पोलीस अधीक्षक सुदर्शन यांच्या आदेशानुसार हे छापे टाकण्यात आले. या कारवाईने अवैध व्यवसायिकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की जिल्हा पोलीस प्रमुख सुदर्शन यांच्या आदेशाने एमआयडीसी पोलिसांनी तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन ठिकाणी छापे टाकले बारा कोटला व गुलमोहर रोड परिसरात अवैधरित्या मावा व सुगंधी तंबाखू तयार करणाऱ्या कारखान्यांवर पोलिसांनी धडक कारवाई केली कुठला या ठिकाणी टाकलेल्या छाप्यात शाहिद फारुख शेख राहणार कुठला गेला ताब्यात घेऊन त्याच्या कब्जातून पोलिसांनी मावा तयार करण्यासाठी लागणारा कच्चामाल सुपारी सुगंधी तंबाखू मावा तयार करण्यासाठी लागणारी मशीन तयार मावा असा सुमारे एक लाख ६६ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला दुसरी कारवाई गुलमोहर रोडवरील आम्रपाली मंगल कार्यालय समोर करण्यात आली यावेळी अक्षय राजू पवार राहणार निंबळक तालुका नगर याला ताब्यात घेण्यात आले त्याच्याकडून मावा निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य मशीन व तयार मावा असा सुमारे एक लाख ६८ हजार दोनशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला या दोन्ही कारवायांमध्ये एकूण तीन लाख ३४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून जप्त मुद्देमाल आणि आरोपींना पुढील तपासासाठी तोफखाना पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे या कारवाईकामी जिल्हा पोलीस प्रमुख का सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी सहाय्यक फौजदार राकेश खेडकर राजीव सुद्रिक आजिनाथ पालवे मुकुंद दुधाळ साईनाथ टेमकर संदिपान पितळे दीपक फुंदे नवनाथ दहिफळे सुरज देशमुख किशोर जाधव अक्षय रोहोकले उमेश शेरकर व सचिन हरदास यांच्या पथकाने परिश्रम घेतले. शासनाने गुटख्यावर बंदी आणल्यानंतर त्याला पर्याय म्हणून गुटखा प्रेमींनी तंबाखू युक्त माव्याला पसंती दिली. नगर शहराबरोबरच अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वत्र माव्याची पान टपऱ्यांमधून राजरोस विक्री केली जाते विशेष म्हणजे नगर जिल्ह्यात तयार केलेल्या मावा ठाणे कल्याण डोंबिवली पासून बीड नाशिक या जवळच्या जिल्ह्यातही पुरवठा केला जातो नगरच्या माव्याची तलफत न्यारी अशी मावा शेवग्यांमध्ये प्रेत आहे.



## शिव-पाणंद शेतरस्ते प्रलंबित प्रकरण मंत्रालयात पुरावे सादर : पवळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या हक्काच्या शेतरस्त्यांचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव-पाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे २३ कलमी मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. यावेळी राज्यभरातील शेकडो प्रलंबित शेतरस्ता प्रकरणांचे पुरावे मंत्रालयात सादर करून मिशन झिरो पेंडन्सी अभियान राबविण्याची जोरदार मागणी करण्यात आली. शेतरस्ता हा शेतकऱ्यांचा मूलभूत हक्क असून शेती उत्पादन, सिंचन व्यवस्था, कृषी यंत्रसामुग्रीची ने-आण तसेच शेतीमाल बाजारपेठेत पोहोचविण्यासाठी अतिक्रमणमुक्त आणि दर्जेदार रस्ते अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाने शेतरस्ते अडविणाऱ्यांविरोधात कठोर धोरण स्वीकारले असले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक अडचणी येत असल्याने हजारो प्रकरणे अद्याप प्रलंबित असल्याचे चळवळीच्या पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले.

निवेदनामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ५(२) व १४३ मध्ये सुधारणा, शेतरस्ते खुले करण्यासाठी विनाशुल्क पोलिस बंदोबस्त, प्रलंबित प्रकरणांचा कालबद्ध निपटारा, मोजणी व अतिक्रमण निर्मूलनासाठी स्वतंत्र निधी, शासकीय यंत्रसामुग्रीची उपलब्धता, डिजिटल पुराव्यांचा वापर, पारदर्शक कार्यपद्धती, स्वतंत्र नियंत्रण कक्ष, ग्रामस्तरीय शेतरस्ता समित्या तसेच शिव-पाणंद रस्त्यांसाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्यासह विविध महत्त्वपूर्ण मागण्या करण्यात आल्या आहेत.

राज्यातील महसूल नकाशावरील सर्व अधिकृत शेतरस्ते शंभर टक्के अतिक्रमणमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, गावनिहाय अहवाल प्रसिद्ध करावेत आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी चळवळीचे प्रणेते व अध्यक्ष शरद पवळे म्हणाले, शेतकऱ्यांच्या हक्काचा शेतरस्ता कोणत्याही परिस्थितीत मिळालाच पाहिजे. राज्यातील शेवटच्या गरजवंत शेतकऱ्याला न्याय मिळेपर्यंत शिव-पाणंद शेतरस्ता चळवळीचा संघर्ष सुरू राहणार आहे. 'शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी' हे स्वप्न साकार करण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. मुख्य महसूल सचिवांकडे राज्यभरातील शेकडो प्रलंबित शेतरस्ता प्रकरणांचे पुरावे सादर करण्यात आले असून शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा शेतकरी बांधवांनी व्यक्त केली आहे.

## रेणावीकर विद्यालयाचे दुहेरी यश गुणवंतांचा सत्कार संपन्न



**अहिल्यानगर :** सावेडीतील रेणावीकर माध्यमिक विद्यालयाने माध्यमिक शालांत परीक्षा मार्च २०२६ मध्ये यंदा दुहेरी यश संपादन केले आहे. अहिल्यानगर मधील नामांकित प्रशाला रेणावीकर माध्यमिक विद्यालयाने यावर्षीच्या निकालात नेहमीचीच परंपरा कायम राखत उत्कृष्ट यश संपादन केले,विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी गौरी मुकेश साठे ही तब्बल ५०० पैकी ४९८ गुण संपादन करून जिल्ह्यात प्रथम स्थानावर आली आहे. विद्यालयाच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा विशेष करून ९०% पेक्षा जास्त गुण संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा काल विद्यालयात शाळा समितीचे अध्यक्ष डॉक्टर राजीव हाजीरनीस यांच्या हस्ते संपन्न झाला.याप्रसंगी विद्यालयात सत्कारमूर्ती विद्यार्थी विद्यार्थिनी,त्यांचे पालक,सर्व अध्यापक त्याचप्रमाणे प्रशालेचे मुख्याध्यापक श्री राजेंद्र कांबळे, नूतन मुख्याध्यापक श्री चंदू गवळी,शाला समितीचे महामात्र डॉक्टर उमेश बिबवे,सदस्य श्री पिंपळे सर व विद्यार्थी उपस्थित होते. कुमारी गौरी मुकेश साठे ९९.६० प्रथम क्रमांक,चिरंजीव राघव शिरीष व्हरसाळे ९८.८० द्वितीय क्रमांक तर सिद्ध आशिष चाकवते ९६.६० गुण प्राप्त करून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.विद्यालयातील ५ विद्यार्थ्यांना संस्कृत मध्ये १०० पैकी १०० गुण प्राप्त झाले आहेत.

# त्यांना मुस्लिम सूचक चालतो कसा?

### एमआयएम राष्ट्रवादीची 'बी टीम'

### दिवसा हिंदुत्व, रात्री हातमिळवणी? विधान परिषद नाट्यावर किरण काळेंचा घणाघात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** लोकशाहीत प्रत्येकाला निवडणूक लढण्याचा अधिकार आहे. निवडणुका पारदर्शकच झाल्या पाहिजेत. मात्र विधान परिषद निवडणुकीच्या अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालय रात्री उशिरापर्यंत बेकायदेशीरपणे कसे सुरू राहिले? असा सवाल ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे. त्यांना सोयऱ्यांच्या विधानपरिषद अर्जावर एमआयएम पक्षाचा मुकुंद नगरचा मुस्लिम नगरसेवक सूचक कसा काय चालतो? असा सवाल त्यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नाव न घेता केला.

काळे यांनी समाज माध्यमांवरून नेटकऱ्यांशी संवाद साधला. हा संवाद मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. राष्ट्रवादीचे बंडखोर उमेदवार दत्तात्रय पानसरे यांच्या अर्जावर एमआयएमचे नगरसेवक शहबाज अहमद सय्यद यांची सूचक म्हणून स्वाक्षरी होती. दुपारी तीन वाजण्यापूर्वी सूचकाने अर्ज मागे घेतल्यानंतर रात्री उशिरापर्यंत हाय व्होल्टेज राजकीय नाट्य रंगले.

यावर टीका करताना काळे म्हणाले, पानसरे यांची बंडखोरी कुणाच्या इशाऱ्यावर होती हे सर्वांनाच ठाऊक आहे. जे स्वतःला कट्टर हिंदू धर्मरक्षक म्हणवतात त्यांनीच मुकुंद नगरच्या आपल्या पूर्वाश्रमीच्या कट्टर कार्यकर्त्याला सोयऱ्यांचे सूचक केले. एका बाजूला एखाद्या समाजाविरोधात टोकाची भूमिका घ्यायची आणि दुसऱ्या बाजूला त्यांच्याशी हातमिळवणी करायची, ही दोन्ही समाजाशी अनैतिक वर्तणूक आहे.



काळे पुढे म्हणाले, सर्वसामान्य नागरिक कार्यालयीन वेळ संपल्यानंतर एक-दोन मिनिटे उशिरा गेला तरी त्याला प्रवेश मिळत नाही. मतदानाची वेळ संपल्यानंतर मतदाराला बूथवर उभे केले जात नाही. मग अर्ज माघारीची मुदत दुपारी तीन वाजता संपल्यानंतर रात्री उशिरापर्यंत जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे कार्यालय सुरू कसे राहिले? निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता संपुष्टात आली असून जनतेचा यंत्रणेवरील विश्वास उडाला आहे झाल.

**एमआयएम ही बी टीम :** अहिल्यानगर शहरातील एमआयएम ही राष्ट्रवादीचीच बी टीम असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले असल्याचा आरोप काळे यांनी केला आहे. काळे म्हणाले, मुस्लिम समाजाच्या मतांवर निवडून येऊन जातीयवादी राष्ट्रवादीचा सूचक बनत जातीयवादी शक्तींना मदत करणाऱ्या प्रवृत्तींना मुस्लिम समाजाने खड्यासारखे बाजूला केले पाहिजे. हिंदुत्ववादी तरुणांनीही राजकीय नेत्यांच्या दुटप्पी भूमिकांचे आत्मपरीक्षण केले पाहिजे.

भविष्यातील निवडणुका जिंकण्यासाठी एमआयएमच्या आडून धर्मनिरपेक्ष मतांमध्ये फूट पाडण्याचे आणि धार्मिक ध्रुवीकरणाचे राजकारण सुरू आहे. अहिल्यानगरकरांनी हा धोका वेळीच ओळखावा. निवडणुका विकासाच्या मुद्द्यांवर व्हाव्यात. रस्ते, पाणी, वीज, महिला सुरक्षा, युवकांसाठी रोजगार, उद्योग-व्यापार यासाठी सत्तेचा वापर व्हावा; राजकीय पोळ्या भाजण्यासाठी नव्हे, असा टोला काळे यांनी लगावला.

द • ख • ल

## बुडणाऱ्या विद्यार्थ्यांस जीवदान दिल्याबद्दल डॉ खलाटे यांचा सन्मान

**बारामती:** बारामती येथील वीर सावरकर स्वीमर्स क्लब येथील जलतरण तलाव मध्ये पोहत असताना शरीराच्या क्षमतेपेक्षा जास्त पोहल्याने दम लागून बुडत असताना (गुरुवार २८ मे २०२६) स्वीमर्स गार्ड यांनी पाण्याच्या बाहेर काढले परंतु शरीरात पाणी गेल्याने सदर विध्यार्थी बेशुद्ध झाला होता . स्वीमर्स क्लब चे सभासद डॉ राधेय खलाटे यांनी प्राथमिक उपचार देऊन त्वरित शरीरातील पाणी बाहेर काढून सदर विद्यार्थ्यांस शुद्धीवर आणून हॉस्पिटलमध्ये मध्ये दाखल करून पुढील उपचार देऊन जीवदान दिल्याबद्दल महाराष्ट्र राज्य औषध विक्री प्रतिनिधी संघटना बारामती तालुका यांच्या वतीने डॉ.राधेय खलाटे यांचा सत्कार करण्यात आला.या प्रसंगी संघटनेचे अध्यक्ष करण जाधव, आणि अक्षय खलाटे, संजय वाघमोडे, खजिनदार बाजीराव बोडरे, भगवान गायकवाड, तेजस लकडे व इतर सभासद उपस्थित होते. संघटनेच्या माध्यमातून सामाजिक भान व जाण ठेऊन विविध सामाजिक उपक्रम राबवित असताना विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वैद्यकीय क्षेत्रातील मंडळींचा सन्मान करून त्यांच्या कार्यास पाठींबा देत असल्याचे अध्यक्ष करण जाधव यांनी सांगितले.आभार बाजीराव बोडरे यांनी मानले.



## दापोडीत शासकीय जागा विकण्याचा प्रकार

**केडगाव :** दापोडी ता दौंड येथे गायरान क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे, जवळपास ३२ एकर असुन हे क्षेत्र सरकारी मालकीचे आहे, या गायरान जागेवर अनेकांनी अतिक्रमणे केली आहे, मोकळी जागा धरून आपला हक्क गाजवण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणावर चालु आहे , मिळालेल्या माहितीनुसार दोन गुंठे जागा विकल्याचा प्रकार समोर आला , जागा नावावर नाही, सरकारी जागा दोन गुंठे विकली सहा लाख रुपयाला , फक्त तोंडी व्यवहार , विकणाऱ्याने शब्द दिला काही अडचण आली तर मी आहे, या शब्दावर जागा घेतली , या जागेची चर्चा गावभर झाली , काही पुढाऱ्यांनी याचा फायदा घेत आपल्या झोळ्या भरल्या , जागा कशी विकत घेतली, शासकिय जागा विकण्याचा व खरेदी करण्याचा अधिकार कोणी दिला , आसा दम गाव पुढाऱ्यांनी दिल्याने शासकिय जागा घेणाऱ्याने गाव पुढाऱ्याचे हात ओले केले, गायरान जमीन स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी नसुन शासकीय योजना त्या ठिकाणी राबवणे हा उद्देश असतो, परंतु तेरी भी चुप मेरी भी चुप आसा प्रकार सध्या सुरू आहे, मी मारल्या सारखं करतो तु मार खाल्ल्या सारख कर अशी म्हणण्याची वेळ आली आहे, सरकारी जागा विकणारा व जागा घेणारा दोषीच असतो , त्यामुळे जागा विकणारा व घेणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे , कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे ,




# डिंभे धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने घट

## धरणात ८.७३ टक्के पाणीसाठा .पाणलोट क्षेत्रातील ऐतिहासिक स्मृतींना उजाळा

**नवनाथ फलके। राष्ट्र सह्याद्री**

**डिंभे :** डिंभे धरणातील पाण्याच्या साठ्यात झपाट्याने घट होत असून पाण्याची क्षमता हि ८.७३% टक्के झाल्याने पाणी पातळीने यंदा तळ गाठला आहे. त्यामुळे धरणाची भिंत त पाणलोट क्षेत्रातील पाटण-बोरघर ही खोरी उघडी पडली आहेत. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाणीच शिल्लक राहिले नसल्याने जुने आंबेगाव गावठाण, घोड व बुब्रा या नद्यांचा संगम उघडा पडला आहे. वचपे येथील आदिवासींचे श्रद्धास्थान असलेले सिद्धेश्वराचे स्थानही उघडे पडले असून, अनेक वर्षांनंतर धरणातील पाणी तळाशी गेल्याने डिंभे धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील ऐतिहासिक स्मृतींना उजाळा मिळाला आहे.

पुणे जिल्ह्यासह नगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, सोलापूर जिल्ह्यातील करमाळा या तालुक्यांबरोबरच शिरूर तालुक्यातील हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणून या भागात हरित क्रांती घडविणार्या



डिंभे जलाशयातील पाण्याने आता तळ गाठला आहे.

धरणाचे बॅक वॉटर आसणार्या घोड व बुब्रा या नद्यांची पात्रे दूरपर्यंत कोरडी ठणठणीत पडली आहेत. यंदा पाण्याअभावी डिंभे धरणाच्या आतील पाणलोट क्षेत्रातील बेंढारवाडी, पाटण-कुशिरे आणि अडिवरे-बोरघर ही तिन्ही खोरी आटली असून त्या भागातील आदिवासी गावांना सध्या तीव्र पाणीटंचाईच्या झळा सहन कराव्या लागत आहेत.

गावातील मंदिरे, भरणार्या यात्रा-अखाड्यांच्या जागा व पिढय़ान् पिढय़ा पोटच्या मुलापेक्षाही जिवापाड जपलेली वडिलोपार्जित शेतीवाडी, आंबा जांभूळ, चिंचेच्या झाडांखाली सवंगड्यांसोबत घालविलेल्या बर्या-वाईट आठवणी या उघड्या पडलेल्या जागा पाहून प्रत्येकाच्या मनात काहूर पेटवत आहेत. पुनर्वसित झालेले गावकरी सध्या या भागात फेरफटका मारून आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न करीत आहेत. याच ठिकाणी आपले जुने घर होते. सध्या धरणातील पाणी आटले, भिंत उघडी पडली असून, वचपे येथील सिद्धेश्वर मंदिराची जागा व घोड आणि बुब्रा या नद्यांचा संगम पाहावयास मिळत आहे. पावसाळा सुरू होताच ज्या नदीला पहिल्यांदा पूर येई, ती नदी दुसर्या नदीला भेटल्याशिवाय पुढे जात नसे, अशी येथील आख्यायिका आहे. आंबेगाव येथे असणारे पुरातन जैन मंदिर सध्या पूर्णत: उघडे पडले असून, तब्बल २० ते २५ वर्षांच्या कालावधीत पाण्याखाली राहूनही या मंदिराच्या भिंती शिलालेख, नक्षीकाम व मंदिरावरील मूर्ती जशाच्या तशा आहेत. गावातील हिंदू देवालयांतील गणपतीच्या मूर्ती, मंदिरासमोर असणारे नंदी तसेच पूजेचे पाळे यांचेही सध्या दर्शन होत असून, या सार्या वस्तू पूर्वीच्या आंबेगाव गावठाणाची साक्ष देतात. आंबेगाव, खेड व जुन्नर या तालुक्यांतील व्यापारी या बाजारासाठी येत. येथे तेलाचे घाणे मोठय़ा प्रमाणात चालायाचे. हे घाणे गाळण्यासाठी तयार करण्यात आलेल्या दगडी उखळी अजूनही येथे मोठय़ा प्रमाणात पाहावयास मिळतात. यावरून येथे मोठय़ा प्रमाणात तेल गाळले जायचे, याचा अंदाज येतो. पाणी खाली-खाली गेले, की मायभूमीपासून दूरवर पुनर्वसित झालेल्या गावकर्यांची पावले नकळत इकडे वळत असल्याचे पाहावयास मिळते. यंदा पाणीपातळी कमालीची घटल्याने डिंभे धरणाचे पाणलोट क्षेत्र रिकामे झाले.

# वृक्षसंवर्धनाची चळवळ लोकसहभागातून अधिक व्यापक करणे आवश्यक : नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सिद्धबेट परिसरात वृक्षारोपण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** ''वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय असंतुलन यामुळे पर्यावरण संवर्धन ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केल्यास भविष्यातील पिढ्यांना स्वच्छ आणि निरोगी पर्यावरण मिळू शकेल, वृक्षसंवर्धनाची चळवळ लोकसहभागातून अधिक व्यापक करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन आळंदीचे नगराध्यक्ष प्रशांत पोपटराव कुऱ्हाडे यांनी केले.जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आळंदी नगरपरिषदेच्या वतीने सिद्धबेट परिसरात आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. पर्यावरण संवर्धन व हरित आळंदीच्या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विविध देशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. या प्रसंगी उपनगराध्यक्षा सुजाता कालिदास तापकीर, मुख्याधिकारी माधव खांडेकर तसेच नगरपरिषदेचे नगरसेवक सचिन गिलबिले, सागर कुऱ्हाडे, सुनील घुंडरे, संतोष रासकर, दिनेश घुले, संदीप रासकर, नगरसेविका साक्षी कुऱ्हाडे, पुजा घुंडरे, ऋतुजा तापकीर, अक्षय कुऱ्हाडे, कालिदास तापकीर, रवींद्र चव्हाण, अनिकेत तापकीर तसेच अधिकारी आणि कर्मचार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करून नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले. संतभूमी आळंदीतील पावन व ऐतिहासिक सिद्धबेट परिसरात झालेल्या या वृक्षारोपण उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाच्या कार्याला नवी दिशा मिळाली आहे. हरित क्षेत्रवाढ, स्वच्छता आणि शाश्वत विकासाच्या ध्येयाने प्रेरित होऊन आळंदी नगरपरिषद भविष्यातही विविध लोकहितकारी पर्यावरणपूरक उपक्रम राबविणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.



## शिरूर तालुक्यात हजारो शेतकऱ्यांचे 'फार्मर आयडी' प्रशासकीय पातळीवर प्रलंबित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाबळ :** शिरूर तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांचे 'फार्मर आयडी' (शेतकरी ओळख) महसूल आणि कृषी विभागाच्या लालफितशाहीत अडकले आहेत. शासकीय कर्जमाफीचा लाभ मिळवण्यासाठी हा फार्मर आयडी अत्यंत अनिवार्य असताना, तो महसूल प्रशासनाकडे प्रलंबित (झशपवळपस) असल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या समस्येबाबत त्यांनी स्थानिक कृषी अधिकारी आणि महसूल अधिकाऱ्यांच्या अनेकदा भेटी घेतल्या. मात्र, ''तुमचे फार्मर आयडी आमच्या स्तरावर नसून थेट तहसीलदारांकडे प्रलंबित आहेत,'' असे सांगून अधिकारी




आपली जबाबदारी झटकत आहेत. कर्जमाफीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात येत असताना, केवळ प्रशासकीय दिरंगाईमुळे शेतकरी हक्काच्या कर्जमाफीपासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली.

शासनाच्या नवीन नियमांनुसार, कोणत्याही योजनेचा किंवा कर्जमाफीचा थेट लाभ मिळवण्यासाठी डिजिटल फार्मर आयडी असणे बंधनकारक आहे. शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही अनेक महिन्यांपासून हे आयडी 'पेंडिंग' दाखवत आहेत. पेरणीचे दिवस जवळ आले असताना, बँकेकडून नवीन पीक कर्ज मिळण्यातही यामुळे अडचणी येत आहेत. तातडीने मार्ग काढण्याची मागणी एकीकडे दुष्काळ आणि पिकांच्या नुकसानीमुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटात आहे. त्यातच शासकीय यंत्रणेच्या या संथ कारभारामुळे शेतकऱ्यांना रोज तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. या गंभीर प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालून, शिरूर तहसीलदारांना प्रलंबित फार्मर आयडी तात्काळ मंजूर करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी तालुक्यातील त्रस्त शेतकऱ्यांकडून केली जात आहे. जर पुढील काही दिवसांत हे आयडी मंजूर झाले नाहीत, तर तीव्र आंदोलनाचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

## कासार समाजातील वधू-वरांसाठी भव्य 'जीवनसाथी' मेळावा संपन्न

**गणेश कुंभकर्ण । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** कासार समाजातील विवाहइच्छुक तरुण-तरुणींना योग्य जोडीदार निवडता यावा, यासाठी पुण्यात आयोजित करण्यात आलेला भव्य-दिव्य 'जीवनसाथी' वधू-वर परिचय मेळावा उत्साहात संपन्न झाला. पुणे जिल्हा विकास समिती आणि सो. क्ष. कासार श्री कालिकादेवी संस्थान, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक ३१ मे २०२६ रोजी बिबवेवाडी येथील गंगाधाम चौकातील वर्धमान सांस्कृतिक केंद्र (शत्रुंजय मंदिर) येथे या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.या मेळाव्याचे अधिकृत उद्घाटन आमदार हेमंत रासने यांच्या हस्ते दिमाखात पार पडले. या मेळाव्याला महाराष्ट्र व देशाच्या विविध भागांतून तसेच परदेशातून ८०० हून अधिक वधू-वरांनी आपली उपस्थिती दर्शवली होती.जास्तीत जास्त विवाह जमवणे हा मुख्य हेतू ठेवून या मेळाव्याची रचना अत्यंत आधुनिक पद्धतीने करण्यात आली होती. या मेळाव्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, परदेशात राहणारे कासार समाजातील उमेदवारही यात ऑनलाईन पद्धतीने थेट सहभागी झाले होते.

तसेच, उमेदवार स्टेजवर परिचय देत असताना त्यांच्या बॅकग्राउंडला मोठ्या स्क्रीनवर त्यांची संपूर्ण माहिती फ्लॅश केली जात होती, ज्यामुळे पालकांना उमेदवाराची माहिती समजणे सोपे झाले.वधू-वरांना एकमेकांशी मनमोकळेपणाने बोलता यावे यासाठी विशेष बैठक व्यवस्था (परिचय कक्ष) करण्यात आली होती. तसेच उमेदवारांमधील संवाद सुलभ करण्यासाठी तरुणांची 'टीम दोस्त' कार्यरत होती. पालक आणि मुलांमध्ये विचारांची एकसूत्रता आणण्यासाठी विशेष समुपदेशन (ऊॅपीशश्रळपस) करण्यात आले. याशिवाय ज्योतिष, कायदेतज्ज्ञ (वकील) आणि डॉक्टरांचे विशेष मार्गदर्शन वधू-वर व पालकांना या ठिकाणी लाभले.कार्यक्रमासाठी सुसज्ज हॉल, प्रशस्त पार्किंग आणि उपस्थित सर्वांसाठी सुग्रास जेवणाची उत्तम सोय करण्यात आली होती. या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी उमेदवारांना ु.ीिपिशझरीरॲ.ले या अधिकृत संकेतस्थळावर नावनोंदणीची सुविधा देण्यात आली होती, ज्याला भारतातून व परदेशातून मोठा प्रतिसाद मिळाला, अशी माहिती अनिल भांडेकर यांनी दिली.हा मेळावा यशस्वी करण्यासाठी पुणे जिल्हा विकास समिती आणि सो. क्ष. कासार श्री कालिकादेवी संस्थानच्या वतीने राजेंद्र अचलारे, आनंद डांगरे, रमाकांत कानडे, अनिल भांडेकर, भास्कर अंदुरे, रंगनाथ उंडे, स्मिता धारूरकर, मंजुषा किवडे, स्वप्नील जुन्नरकर, रोहन उंडे, मंदार सासवडे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. समाजातील सर्व स्तरांतून या मेळाव्याचे अत्यंत कौतुक होत आहे.

# सासवड शहरात वृक्षारोपण करून जागतिक पर्यावरण दिवस साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** ५ जून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सासवड शहरात विविध ठिकाणी वृक्ष लागवड व अन्य उपक्रम करून हा दिवस साजरा करण्यात आला.सासवड नगरपालिका, स्व एकनाथ काकाजगताप प्रतिष्ठान, माजी सैनिक प्रतिष्ठान, मोहिनी टि ग्रुप गोकुळ दहीहंडी उत्सव समिती आदी विविध संस्थानी आज विविध ठिकाणी हा दिवस साजरा केला वाघ डोंगर जवळील पाणी पुरवठा टाकीजवळ सासवड

नगरपालिकेच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले.सासवड पालिका मुख्यधिकारी डॉ कैलास चव्हाण, नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, उपनगरध्यक्ष मनोहर जगताप, आरोग्य सभापती राजन जगताप, पाणी पुरवठा सभापती माऊलीं गिरमे, गटनेते अजित जगताप, नगरसेवक प्रदीप राऊत यांसह पालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होतें. नागरिकांनी अधिक झाडें लावून हरित सासवड करण्यासाठी सहकार्य करावे, हे केवळ नगर पालिकेचे काम नसून नागरिकांनी या उपक्रमात उत्फूर्त सहभाग दाखवावा असे आवाहन आनंदीकाकी जगताप व डॉ कैलास चव्हाण यांनी केले.

सासवड येथील पालखी तळावर भाजप शहर अध्यक्ष आनंदभय्या जगताप यांनी वृक्षारोपण केले.युवा प्रदेश सचिव अजिंक्य टेकवडे, बाळासाहेब इटकर, उदय जगताप, एन जी ओ सेल जिल्हाध्यक्ष संतोष जगताप, ओंकार महागावकर, जयेंद्र निकम, मोहन चव्हाण, आकाश जगताप, नगरसेवक अजित जगताप, प्रदीप राऊत, आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. सासवड एस टी स्थानक परिसरात गतवर्षी लावलेल्या झाडांचा वाढदिवस साजरा करून व झाडांना पाणी घालून स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानने हा दिवस साजरा केला. संतोष जगताप, हेमंत ताकवले, जीवन कड, संदीप जगताप, विठ्ठल राशीनकर यांनी यावेळी उपस्थिती दाखवली.मोहिनी टी ग्रुप मधील तानाजी सातव व मोहनअण्णा जगताप हे ''ई '' व्हेईकलचा वापर करतात त्यांचा सन्मान डॉ राजेश दळवी, दादा भुजबळ, मोहन चव्हाण, हेमंत ताकवले, माऊलीं गिरमे यांनी केला.

## कांदा आंदोलन प्रकरणी देवदत्त निकमांसह २५० जणांवर गुन्हा

### आमदार-खासदार वगळून शेतकऱ्यांवरच कारवाई?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वळती,:** भोरवाडी (ता. आंबेगाव) येथे कांद्याला हमीभाव मिळावा, निर्यातबंदीचे धोरण मागे घ्यावे आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाने लक्ष द्यावे या मागण्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या महामोर्चा आंदोलनानंतर मंचर पोलिसांनी मोठी कारवाई करत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)चे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांच्यासह सुमारे २०० ते २५० आंदोलनकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मात्र आंदोलनात सहभागी झालेल्या काही आमदार आणि खासदारांची नावे गुन्ह्यात नसल्याने शेतकरी व कार्यकर्त्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

मंचर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजेश खंडेराव नलावडे यांनी सरकारतर्फे फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आंदोलनासाठी पूर्वपरवानगी घेण्यात आली होती. मात्र, रास्तारोको न करण्याच्या अटीचे उल्लंघन करून पुणे-नाशिक महामार्गावरील नंदी चौक परिसरात वाहतूक रोखण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

२ जून रोजी भोरवाडी येथे झालेल्या सभेला विविध राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेनंतर आंदोलकांनी महामार्गावर ठिय्या आंदोलन करत रास्तारोको केला. पोलिसांनी वारंवार सूचना व समज दिल्यानंतरही आंदोलकांनी सकाळी सुमारे ११.३० ते १२.३० या कालावधीत आंदोलन सुरू ठेवल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणात देवदत्त निकम यांच्यासह गणेश यादव, धोंडीभाऊ भोर, विशाल वाबळे, दिगंबर वाव्हळ, राहुल बहीरट, सिताराम म्हस्के यांच्यासह इतर अनेक आंदोलनकर्त्यांची नावे नमूद करण्यात आली आहेत. आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत होऊन नागरिकांची गैरसोय झाल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

दरम्यान, आंदोलनात सहभागी झालेल्या काही लोकप्रतिनिधींवर कारवाई न झाल्याने केवळ सर्वसामान्य शेतकरी आणि कार्यकर्त्यांनाच लक्ष्य करण्यात आल्याची चर्चा परिसरात सुरू झाली आहे. त्यामुळे या कारवाईवरून राजकीय वर्तुळातही प्रश्न उपस्थित होत आहेत.

या गुन्ह्याबाबत आंदोलनकर्त्यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नसून, मंचर पोलीस पुढील तपास करत आहेत.




# शिरुरमध्ये पत्रकाराला गलिच्छ भाषेत शिविगाळ

## बातमीचा व्हिडिओ हटविण्याचा प्रयत्न; अँड.विकास कुटे यांच्यावर गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाबळ :-** लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारितेवर दबाव टाकून डिजिटल पुरावे हटविण्यास भाग पाडण्याचा गंभीर प्रकार शिरूर तालुक्यात उघडकीस आला आहे. सार्वजनिक हिताच्या विषयांवर वृत्तांकन करणाऱ्या पत्रकाराला धमक्या देत सोशल मीडियावरील व्हिडीओ आणि बातम्या हटविण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी रांजणगाव गणपती येथील अँड.विकास कुटे यांच्याविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शिंदोडी (ता. शिरूर) येथील पत्रकार व शेतकरी तेजस रामदास फडके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता (इछड) कलम २९६, ३५१(२), ३५१(३) व ३५२ अन्वये हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेमुळे पत्रकारिता क्षेत्रात खळबळ उडाली असून पत्रकारांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिरूर तहसिल कार्यालयाच्या बाहेर रस्त्यावर रांजणगाव औदयगिक वसाहतील एका खाजगी कंपनीच्या ीर्शिशळश्रश्रॲ लश्रळपळलरश्र ििि.शिॲ.िॲ खींव या नावाने असलेली पांढ-या रंगाची टोयटा लिजेंडर गाडी वाहन क्र. चक-१२ धक-९०७३ या गाडीवर भारतीय राजचिन्हासह आमदार नावाच्या स्टिकर चा गैरवापर केल्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळुंज यांनी याबाबत तक्रार केल्याने शिरूर पोलीसांनी संबधीत वाहनावर कारवाई केली होती. या गोष्टीचा व्हिडीओ पत्रकार तेजस फडके यांनी पोस्ट केला होता. त्यासदर्भात ॲड. विकास कुटे यांनी पत्रकार तेजस फडके यांना फोन करून म्हणाले की ''त्या व्हिडीओ मध्ये दिसणारी गाडी हि माझे सख्ये दाजी यांची असुन ते राज्यमंत्री मेघना बोर्डीकर मॅडम याचे दिर असुन ती गाडी हि कंपनीच्या नावाने रजिस्टर आहे व ती कंपनी पण मेघना बोर्डीकर मॅडम च्या नावाचे रजिस्टर आहे असे म्हणाला.त्यांनतर पत्रकार फडके ॲड विकास कुटे यांना म्हणाले की तुम्ही अर्जुन शेळके यांना खोट का सागितल आणि त्याच्या ईन्स्टावरचा संबधित कारवाईचा व्हिडीओं खोट बोलुन का डिलीट करायला लावला असे विचारले. त्यांनतर सदरचा व्हिडीओ शिरूर तालुका डॉट कॉम च्या अधिकृत ईन्स्टा ग्रॉम च्या पेज वरून डिलीट करण्यासाठी विकास कुटे यांनी फडकेवर दबाव टाकला. दोन काढून टाकल्यामुळे कुठे यांनी गलिच्छ भाषेत त्यांना शिवीगाळ केली आहे.

तेजस फडके हे सामाजिक, प्रशासकीय आणि सार्वजनिक हिताच्या विषयांवर सातत्याने वृत्तांकन करीत असतात. पत्रकारितेचे कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्तीला धमकावून अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा हा प्रयत्न असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेची माहिती समोर येताच पत्रकार संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. पत्रकारांना धमकावून अथवा दबावाखाली आणून वृत्तांकन रोखण्याचे प्रयत्न लोकशाहीसाठी घातक असल्याची प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली आहे. दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे.

दरम्यान, २ जून २०२६ रोजी रात्री उशिरा शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, मोबाईल संभाषणांचे रेकॉर्ड, सोशल मीडिया नोंदी, डिजिटल पुरावे आणि इतर तांत्रिक बाबींची सखोल तपासणी सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

पत्रकारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा चर्चेत सार्वजनिक हिताच्या विषयांवर निर्भीडपणे वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांना धमक्या देणे, त्यांच्यावर दबाव टाकणे आणि पुरावे हटविण्यास भाग पाडणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. या घटनेमुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा चिंता व्यक्त केली जात असून, प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. या प्रकरणाच्या तपासातून आणखी कोणते धागेदोरे समोर येतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

दरम्यान पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यास शिरूर पोलिसांनी नकार दिला असून शिरूर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहे. या प्रकरणात शिरूर पोलिसांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा दबाव आला असल्याचीही सूत्रांची खात्रीलायक माहिती आहे. त्यामुळे पत्रकार संघटनेकडून या घटनेचा निषेध व्यक्त केला जात आहे. आंधळ दळतय आणि कुत्र पीठ खातय...अशी अवस्था शिरूर पोलीस ठाण्याची झाली असून कायदा सुव्यवस्थेची पूर्णपणे वाट लागलेली आहे. दिवसाढवळ्या शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत निर्घृन खून होत असून शिरूर पोलिसांचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळूंज यांनी सांगितले आहे. गाड्यांवर विनापरवाना आमदार,खासदार,व राजचिन्ह वापरणाऱ्या असे स्टिकर वापरणाऱ्या वाहनांवर फक्त पाचशे रुपयांचे चलन फाडून त्यांना मोकाट सोडून दिले जात आहे. कायदयानुसार गुन्हा दाखल केला जात नाही. बड्या राजकारण्यांना पाठीशी घालण्याचा जाणीवपुर्वक प्रयत्न शिरूर पोलीस ठाणे करत असल्याचे गंभीर आरोप निलेश वाळुंज यांनी केला आहे.

द•ख•ल

## उज्वल भविष्यासाठी पर्यावरणाचे रक्षण करा : जगताप




**श्रीगोंदा :** दिवसेदिवस वातावरणात वेगवेगळे बदल होवून पर्यावरणाचा समतोल ढासळत चाललेला असून भविष्यात सर्वासाठी धोक्याची सुचना आहे. हाच धोका कमी करायचा असेल तर पर्यावरणाचा समतोल योग्य पध्दतीने ठेवण्यासाठी आपल्या हातात आहे. यासाठी उज्वल भविष्यासाठी प्रत्येकांने पर्यावरणाचे रक्षण करावे. असे आव्हान सामाजिक वनीकरण विभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी ड.पल्लवी जगताप-उंडे यांनी बोलताना केले आहे. दि.५ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त श्रीगोंदा तालुक्यातील भानेश्वर विद्यालय व जूनियर कॉलेज भानगाव येथे वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण श्रीगोंदा यांचे मार्फत जागतिक पर्यावरण दिन वृक्षारोपण करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी वेळी कार्यक्रमाला वनपरिक्षेत्र अधिकारी, श्रीमती ड.पल्लवी जगताप (उंडे)सामाजिक वनीकरण श्रीगोंदा यांनी या पावसाळ्यात संकल्प करू, प्रत्येकाने एक तरी झाड लावू , तसेच पर्यावरणाचे करा रक्षण, उज्वल भविष्याचे हेच धोरण अशा शब्दात झाडे लावा झाडे जगवा असा मौलिक संदेश विद्यार्थ्यांना केला. कार्यक्रमासाठी भानेश्वर विद्यालय व जुनिअर कॉलेजचे प्राचार्य विश्वनाथ शेलार यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी , व शिक्षक वृंद उपस्थित होते. त्याचप्रमाणे एच टी .गारुडकर वनपाल, एस आर निलाखे वनरक्षक , डी बी तोरडमल वनरक्षक , आणि व्ही एम बनसोडे वनरक्षक इत्यादी वन अधिकारी उपस्थित होते.शेवटी वनविभाग यांच्या वतीने विद्यार्थ्यांना अल्पोपहार देवून प्राचार्य विश्वनाथ शेलार यांनी आभार मानले.

## ..तर ग्रामपंचायतींची चौकशी करा



**पाथर्डी :** राज्य शासनाचे स्पष्ट आदेश असतानादेखील ज्या ग्रामपंचायतींनी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी केली नाही व गावातील दोन महिलांना अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार दिला नाही. अशा ग्रामपंचायतीची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष नानासाहेब पडळकर व राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीच्या कार्यकर्त्यांनी तहसिलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. पाथर्डीचे नायब तहसीलदार किशोर सानप यांची भेट घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी सेल तालुकाध्यक्ष नानाभाऊ पडळकर, मोहजचे माजी सरपंच गणेश चितळकर, दत्ताभाऊ दातीर, सोपान जाधव, गोविंद लोखंडे, अर्जुन लोखंडे यांनी पाथर्डी तालुक्यात काही ग्रामपंचायतींमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी झालेली नाही व गावातील कर्तृत्वान महिलांना दिला जाणारा अहिल्यादेवी होळकर पुरस्कारही दिलेला नाही, असे आमच्या निदर्शनास आलेले आहे. तालुक्यातील अशा ग्रामपंचायतींची चौकशी होऊन संबंधित ग्रामपंचायती व ग्रामविकास अधिकारी यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी कार्यकर्त्यांनी सानप यांच्याकडे केली आहे. याबाबत नानाभाऊ पडळकर यांनी लेखी निवेदन सादर केले आहे. मागणी कार्यकर्त्यांनी केली आहे.

## सद्गुरूंचा एक शब्द माणसाला निर्भय बनवतो: चेडे महाराज

**ढोरजळगाव :** सद्गुरूंच्या केवळ एका वाक्याने (उपदेशाने) शिष्याचे अंतःकरण ज्ञानाने प्रकाशमान होते आणि अज्ञानाचा अंधार पार निघून जातो. आत्मज्ञानामुळे शिष्याचे चित्त म्हणजेच मन अत्यंत



'निधडे' (निर्भय, धीट आणि स्थिर) होते. त्याच्या मनातील सर्व प्रकारच्या शंका, भ्रम कायमचे मिटून जातात. थोडक्यात, सद्गुरूंचा एक शब्द माणसाला थेट ब्रह्मस्वरूपाची अनुभूती आणून देतो आणि त्याला पूर्णपणे निर्भय बनवतो. असे प्रबोधन संतसेवक हभप सिताराम महाराज चेडे यांनी केले. शेवगाव तालुक्यातील रांजणी येथील श्री गणपती मंदिरात संकष्टी चतुर्थीचे औचित्य साधून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रंथराज ज्ञानेश्वरीतील जयाचेनि वाक्यें उजवडें । जाहलें चित्त निधडें । ब्रह्माचेनि पाडें । निशंकु होय ।। या ओवीवर विवेचन करताना चेडे महाराज बोलत होते. सकाळी श्री गणेश मूर्तीचा अभिषेक, महापूजा, प्रवचन सेवा संपन्न झाली. यावेळी गावातील व पंचक्रोशीतील वारकरी, गणेश भक्त, महिला व तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. प्रवचन सेवेनंतर भाविकांसाठी कुशीनाथ करंजे, अण्णासाहेब नारळकर, दत्तात्रय थोरात, भगवान चव्हाण आणि पंकज शिदोरे यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. रांजणी येथील ग्रामस्थांच्या शिस्तबद्ध नियोजनामुळे हा संकष्टी चतुर्थीचा सोहळा अत्यंत भक्तीमय आणि उत्साही वातावरणात पार पडला.

## राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ प्रा. मरकड व प्रा. ढाकणे यांची निवड

**शेवगाव :** समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेवगाव येथील प्रा. महेश शहाराम मरकड आणि





प्रा. श्रीकांत एकनाथराव ढाकणे यांची ऋश्चेलरश्र एश्रळींश चशवळर तर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ साठी निवड झाली आहे. प्रा. महेश मरकड हे प्राध्यापक, विभागप्रमुख तसेच प्रशिक्षण व नियुक्ती अधिकारी म्हणून कार्यरत असून विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकास, प्लेसमेंट आणि संशोधन क्षेत्रातील योगदानासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. तर प्रा. श्रीकांत ढाकणे यांची विद्यार्थीकेंद्रित अध्यापन, उत्कृष्ट संघटन कौशल्य, प्रभावी व्यवस्थापन आणि शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल निवड झाली आहे. सदर पुरस्कार वितरण सोहळा दि. १४ जून २०२६ रोजी पुणे येथील ड्डलळींळी तळारप छरसरी उराििं -ींवळींीळीं येथे होणार असून पुरस्कारार्थींना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष डॉ. एकनाथराव ढाकणे, कोषाध्यक्ष हृषीकेश ढाकणे, प्राचार्य, प्रा. डॉ. रियाझखान अत्तार, प्रा. डॉ. अंबादास डोंगरे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी दोन्ही प्राध्यापकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची श्रीगोंदा तालुक्यात धडक कारवाई

## गोवा बनावटीच्या विदेशी मद्यासह ६.८३ लाखांचा मुद्देमाल जप्त

दादा सोनवणे। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने श्रीगोंदा तालुक्यातील येळपणे व शिरसगाव बोडखा परिसरात धडक कारवाई करत गोवा राज्य निर्मित आणि महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधित विदेशी मद्यसाठा जप्त केला. या कारवाईत एक आरोपीला अटक करण्यात आली असून दोघेजण फरार आहेत. एकूण ६ लाख ८३ हजार ९१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मा. अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर श्री. प्रमोद सोनोने यांच्या तसेच उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांच्या मार्गदर्शनाखाली



निरीक्षक सुरज कुसळे यांच्या पथकाने दि. ३ जून २०२६ रोजी खात्रीलायक माहितीच्या आधारे ही कारवाई केली.

पथकाने येळपणे व शिरसगाव बोडखा परिसरात सापळा रचून फोर्ड कंपनीची चारचाकी (चक१२ ठघ २३४७) आणि हीरो कंपनीची दुचाकी (चक१६ उघ ३५३२) अडवून तपासणी केली. वाहनांमध्ये खाकी रंगाच्या बॉक्समध्ये विविध ब्रँडचा गोवा राज्य निर्मित विदेशी मद्यसाठा आढळून आला.

जप्त मद्यामध्ये रॉयल चॅलेंज व्हिस्की, रॉयल स्टॅग व्हिस्की, मॅकडॉवेल नं. १ व्हिस्की, रोमनोव्ह वोडका आणि ओल्ड मंक रम या ब्रँडच्या एकूण १३ बॉक्सचा समावेश असून ११३.३८ बल्क लिटर मद्य जप्त करण्यात आले.

या प्रकरणी जालिंदर अजिनाथ गोल्हार (रा. वाबळेवस्ती, शिरसगाव बोडखा, ता. श्रीगोंदा) यास अटक करण्यात आली असून महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आणखी दोन आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

सदर कारवाईत दुय्यम निरीक्षक आनंद जावळे, विनायक चव्हाण तसेच जवान सुरज पवार, चतुर पाटोळे, सुनील निमसे, सिद्धांत गिरिगोसावी, पांडुरंग गदादे, महिला जवान अर्चना दहिफळे व सुनंदा अकोलकर यांनी सहभाग घेतला.

गोव्याची बाटली, श्रीगोंद्याची वाट आणि उत्पादन शुल्क विभागाचा थेट काटा अशी चर्चा या कारवाईनंतर परिसरात रंगू लागली आहे.

# पाथर्डीत अक्षर संस्कार शिबिराचा उत्साहात समारोप

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असे शिबिर गरजेचे : अक्षय पवार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** आजच्या स्पर्धेच्या युगात सुंदर हस्ताक्षराला खूप महत्त्व आहे. वळणदार अक्षरामुळे उत्तम संस्काराची रुजवणूक मुलांमध्ये होते. अशा शिबिराच्या माध्यमातूनच बालकांची जडणघडण होऊ शकेल. ज्यामुळे भविष्यात सुजाण नागरिक व बलशाली भारताचे स्वप्न पूर्ण होईल असे मत नुकतेच यु.पी.एस.सी परीक्षेतून इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस मध्ये निवड झालेले नवनियुक्त अधिकारी अक्षय पवार यांनी व्यक्त केले.

गेल्या दोन महिन्यापासून सुरु असलेल्या श्री वसंतराव नाईक वाचन मंदिरच्या अक्षर संस्कार शिबिराचा समारोप संपन्न झाला या उन्हाळी शिबिरात एकूण ६० विद्यार्थी सहभागी झाले होते.अक्षर संस्कारा बरोबरच निसर्ग संस्कार, नृत्य संस्कार, रंगभरण संस्कार नैतिक मुल्य तसेच इतर शिस्तीचे धडेही या शिबिरात विद्यार्थ्यांना देण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य अजयकुमार भंडारी होते तर व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष विष्णुपंत पवार सुधीर सुडके आदी उपस्थित होते. प्राचार्य अजय भंडारी यांनी उपस्थित बालकांना जीवनात यशस्वी होण्यासाठी संस्काराचे महत्त्व समजावून सांगितले. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांत देशभक्ती, संस्कारक्षम विचार आणि सकारात्मक जीवन मूल्याची रुजवणूक केली जात आहे. अशा उपक्रमाचे स्वरूप भविष्यात वाढवावे यासाठी यथोचित मदत करण्याची ग्वाही त्यांनी दिली. वाचन मंदिराच्या वतीने राबवला जाणारा हा उपक्रम कौतुकास्पद आहे.यामुळे बालकांना एक नवी दिशा मिळत असल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. यावेळी या उपक्रमातील सर्वोत्तम सुलेखनकार व रंगभरण स्पर्धेत उत्कृष्ट चित्र रंगवणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन सन्मानित करण्यात आले. शिबिरात प्रशिक्षणार्थी सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या उपक्रमासाठी सुप्रसिद्ध सुलेखनकार गणेश कांबळे व दिपक राठोड यांचे मार्गदर्शन लाभले शिबीर यशस्वीतेसाठी प्रा.सविता पवार, वैशाली चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रास्ताविक शिवाजी चव्हाण ,सूत्रसंचालन सचिन चव्हाण तर आभार विलास पवार यांनी मानले.

## पर्यावरणाचे संतुलनासाठी वृक्षारोपण व संवर्धन काळाची गरज : आव्हाड



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**टाकळीमानुर :** पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज आहे. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि घटणारे जंगल क्षेत्र यामुळे पर्यावरणासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. प्रत्येक नागरिकाने दरवर्षी किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा. वृक्ष केवळ ऑक्सिजन देत नाहीत, तर भावी पिढ्यांसाठी समृद्ध आणि निरोगी पर्यावरण निर्माण करतात. पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारचीच नव्हे तर प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे असे प्रतिपादन नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पाथर्डी नगरपरिषद व वन विभागाच्या संयुक्त विद्यमाने शहरातील एडके कॉलनी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले त्यावेळी आव्हाड बोलत होते. यावेळी उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे तथा वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर यांच्या हस्ते विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी नगरसेवक नंदकुमार शेळके, मनीषा उदमले, संजय देशमुख, बंडूशेठ बोरुडे, वंदना टेके, सुभाष बोरुडे,प्रतिक नांगरे, संदीप पवार, सिंधू साठे, प्रा. संपत गर्जे, संतोष एडके, सुरेश एडके, अशोक साठे, महेश फाजगे, वनक्षेत्रपाल बबन मंचरे, विजय पालवे, आप्पा घनवट, सागर साळवे, कृष्णा बडे, सविता रायकर, वर्षा गीते, बालिका फुंदे, मारुती नाईकवाडे, इंद्रभान चितळे, भाऊसाहेब खंडागळे, शिवनाथ जिवडे , सुनील परदेशी, अनिल आरगडे आदी उपस्थित होते. एडके कॉलनी येथे मुख्य रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांच्या घरासमोर तसेच मोकळ्या जागेवर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी बोलतांना वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर म्हणाले की पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी वृक्षसंवर्धन अत्यंत महत्त्वाचे आहे. वृक्षारोपणा बरोबरच लावलेल्या झाडांचे संगोपन करणे हीदेखील तितकीच मोठी जबाबदारी आहे. हिरवळ वाढली तर पाणी, हवा आणि जैवविविधतेचे संरक्षण होण्यास मदत होईल. प्रत्येकाने पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करावा.यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत नागरिकांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वृक्षारोपणानंतर उपस्थितांनी परिसर हिरवागार करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# शेवगाव तहसील कार्यालयातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

## कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची माहिती देण्यास टाळाटाळ?

सुरेश पाटील। राष्ट्र सह्याद्री

**अमरापूर :** शासकीय कार्यालयांमधील पारदर्शकता आणि नागरिकांना मिळणाऱ्या सेवांच्या गुणवत्तेबाबत नेहमीच चर्चा होत असते. अशातच शेवगाव तहसील कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत माहिती मिळविण्याच्या प्रयत्नादरम्यान पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नसल्याचा प्रकार समोर आला आहे. माहितीनुसार, तहसील कार्यालयाच्या पुरवठा शाखेमध्ये काही कर्मचारी त्यांच्या नियमित जागेवर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी आस्थापना विभागाकडे हजेरी रजिस्टर तसेच हालचाल (मुव्हमेंट) रजिस्टर पाहण्याची विनंती करण्यात आली. मात्र, या संदर्भात तहसीलदारांची परवानगी आवश्यक असल्याचे सांगण्यात आल्याचा दावा संबंधितांनी केला आहे. त्यानंतर तहसीलदार आकाश दहाडदे यांची भेट घेऊन कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती व कार्यालयीन नोंदींबाबत विचारणा करण्यात आली. यावेळी कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण करू नये, असे सांगण्यात आल्याचे उपस्थितांचे म्हणणे आहे. पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, शासकीय कार्यालयात नागरिकांची विविध कामे प्रलंबित असतात. अशा वेळी संबंधित कर्मचारी उपलब्ध नसल्यास त्याबाबत माहिती मिळणे हा नागरिकांचा अधिकार आहे. तसेच हजेरी व हालचाल नोंदींबाबत आवश्यक ती पारदर्शकता ठेवली गेल्यास गैरसमजांना वाव राहणार नाही.

# राष्ट्रवादीचे नगरसेवक शेख यांचे जात प्रमाणपत्र रद्द

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** शेवगाव नगरपरिषदेतील नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) राखीव जागेवरून निवडून आलेले नगरसेवक रिजवान छोटुभाई शेख यांचा मुलाणी (इतर मागास वर्ग) जातीचा दाखला जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अहिल्यानगर यांनी अमान्य ठरविला असून त्यांचे जात प्रमाणपत्र रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे शेवगावच्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

समितीने १ जून २०२६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार, उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांनी ७ जानेवारी २०२१ रोजी निर्गमित केलेले मुलाणी या प्रवर्गातील जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र जात प्रमाणपत्र पडताळणी अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार संबंधित प्रमाणपत्राच्या आधारे मिळालेले लाभ रद्द व वसुलीपात्र ठरू शकतात, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी शिवसेना शिंदे गटाचे पराभूत उमेदवार प्रताप मुकुंदराव फडके यांनी जातदाव्यावर हरकत घेत तक्रार दाखल केली होती. त्यांनी अर्जदाराने सादर केलेली वंशावळ, पूर्वजांची माहिती आणि जातीच्या दाव्यासाठी वापरलेले पुरावे संशयास्पद असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर जिल्हा जात पडताळणी समितीने दक्षता पथकामार्फत सखोल चौकशी केली.

चौकशीदरम्यान अर्जदाराने सादर केलेल्या अनेक कागदपत्रांमध्ये मुलाणी जातीचा स्पष्ट उल्लेख नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. तसेच कोपरगाव तालुक्यातील धोत्रे येथील मोडी लिपीतील जन्म उताऱ्याची पडताळणी केली असता मूळ शासकीय अभिलेखात संबंधित नोंद उपलब्ध नसल्याचे आढळून आले. याबाबत तहसीलदार, कोपरगाव यांनीही लेखी अभिप्राय दिला होता.

समितीने आपल्या निर्णयात अर्जदाराच्या वंशावळीतील नातेसंबंध सिद्ध करणारे ठोस महसुली अथवा शासकीय पुरावे उपलब्ध नसल्याचे नमूद केले . तसेच विविध कागदपत्रांमधील नावांतील विसंगती, मूळ गावाबाबत पुरेशा पुराव्यांचा अभाव आणि पारंपरिक मुलाणी' व्यवसायाचा दस्तऐवजी पुरावा सादर करण्यात आलेले अपयश या बाबींचाही उल्लेख केला आहे. दुसरीकडे, अर्जदाराने तक्रार राजकीय हेतूने व निवडणुकीतील पराभवानंतर सूडबुद्धीने करण्यात आल्याचा दावा केला होता.

# रेशन कार्डवर सरकारी नोकरीचा डल्ला?

## अपात्र कर्मचाऱ्यांवर सरकारचा 'रेड सिग्नल'

दादा सोनवणे। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** गरीबांच्या ताटातील घास कोण खातंय? याचा शोध आता प्रशासनाने सुरू केला असून पिवळे आणि केशरी रेशन कार्ड वापरणाऱ्या सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार आली आहे. अपात्र असूनही स्वस्त धान्य योजनेचा लाभ घेणाऱ्यांनी तात्काळ रेशन कार्ड सरेंडर करावे, अन्यथा फौजदारी गुन्ह्यासह निलंबनाची कारवाई होऊ शकते, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

जवळपास सगळीकडेच सरकारी, निमसरकारी कर्मचारी तसेच अनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडे अजूनही पिवळे (इझङ) किंवा केशरी (-झङ) रेशन कार्ड असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, चांगला पगार, भत्ते आणि आर्थिक स्थैर्य असतानाही काही जण गरीबांसाठी असलेल्या योजनांचा लाभ घेत असल्याने प्रशासन आता ॲक्शन मोडमध्ये आले आहे.पिवळे रेशन कार्ड हे अत्यंत गरीब आणि दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी असते, तर केशरी कार्ड मर्यादित उत्पन्न गटासाठी दिले जाते.

मात्र अनेक ठिकाणी सरकारी नोकरी करणारे कुटुंबातील सदस्य असूनही हे कार्ड वापरले जात असल्याचे निदर्शनास आले आहे.प्रशासनाच्या माहितीनुसार, दोषी आढळलेल्या कर्मचाऱ्यांकडून आतापर्यंत घेतलेल्या धान्याची रक्कम बाजारभावाने वसूल केली जाऊ शकते. तसेच फसवणुकीचा गुन्हा दाखल होण्याबरोबरच शासकीय सेवा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी निलंबनाची कारवाईही होऊ शकते.

गरिबांच्या हक्काचे धान्य खाऊन सरकारी पगारही घ्यायचा, हा दुहेरी फायदा आता चालणार नाही, अशी भूमिका प्रशासनाने घेतल्याची चर्चा आहे. दरम्यान, अपात्र लाभ घेत असलेल्या कर्मचाऱ्यांनी स्वतःहून स्थानिक पुरवठा कार्यालय किंवा तहसील कार्यालयात जाऊन पिवळे किंवा केशरी रेशन कार्ड जमा करून पांढरे कार्ड घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पांढऱ्या कार्डवर कोणतेही अनुदानित धान्य मिळत नसले तरी ओळख व रहिवासी पुरावा म्हणून त्याचा वापर करता येतो.आता प्रशासनाच्या या मोहिमेमुळे अनेक लपलेले लाभार्थी उघडकीस येणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शेवगाव ५४ ग्रामपंचायतीचे प्रभाग आरक्षण ग्रामसभेतून

## ९ ते ११ जूनला जाहीर होणार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** सन २४/२५ व २५ /२६ मध्ये मुदत संपलेल्या शेवगाव तालुक्यातील ५४ ग्रामपंचायतीच्या ठिकाणी नव्याने निवडणुका घेण्यासाठी प्रशासकीय पातळीवरून जोरदार हालचाली सुरू झाल्या असून या सर्वच ठिकाणच्या प्रभाग रचनाही निश्चित झाल्या असून आता त्या प्रभागातून निवडून जाणारे जे सदस्य आहेत त्याचे आरक्षण निश्चित करण्यासाठी येत्या ९ ते ११ जून दरम्यान निवडणूक होत असलेल्या प्रत्येक गावात ग्रामसभा घेण्यात येऊन त्यामधूनच निवडून जाणाऱ्या सदस्यांचे आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे. अशी माहिती तहसीलदार आकाश दहाडदे व निवडणूक शाखेचे अव्वल कारकून सुरेश बर्डे यांनी दिली आहे. या बाबत माहिती देताना ते म्हणाले की, तालुक्यातील ५४ ग्रामपंचायतीच्या मुदती संपल्या असल्याने त्या ठिकांणी नव्याने निवडणुका घेण्यासाठीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने हाती घेतला असून या पूर्वीच या ५४ गावातील प्रभाग रचना तयार करण्यात आलेल्या असून त्यावर हरकती मागून त्या निश्चित करण्यात आल्या आहेत. मात्र आता त्या प्रत्येक प्रभागातून निवडून जाण्यासाठी ज्या जागा आहेत त्याचे प्रभागवाइज आरक्षण आता प्रत्येक गावात ग्रामसभा घेऊन निश्चित केले जाणारं असल्यामुळे एकूण ५४ ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेसाठी अनेक तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या असल्याचे सांगून दहाडदे व बर्डे म्हणाले की, ठाकूर पिंपळगाव, बक्तरपुर, निंबेनांदूर, मजलेशहर, शेकटे बुद्रुक, लखमापूरी, सुकळी,कोळगाव, हसनापूर, सोनविहिर, शिंगोरी, कोनोशी, अधोडी, खुंटेफळ, बोडखे, दादेगाव, ताजानापूर,गायकवाड जळगाव, कांबी, वाडगाव, नागलवाडी, सुलतानपूर,भाविनिमगाव, भातकुडगाव, नवीन दहीफळ, जुने दहिफळ, राणेगाव, अंतरवली बुद्रुक व खुर्दशे, चेंडेचांदगाव,




ढोरजळगाव ने, दहिगाव शे, आखातवाडे, तळणी, गदे वाडी, हातगाव, ढोरजळगाव हा शे, आव्हाने खुर्द, बेलगाव,चापडगाव, घोटण, माळेगांव - शे, नजिकबाभुळगाव,पिंगेवाडी , राक्षी, सोनेसांगवी,ठाकूर निमगाव व वरखेड या ग्रामपंचायतीचे आरक्षण जाहीर होणार असून सन २०११ ची जनगणना लक्षात घेता त्यावेळच्या लोकसंख्यानुसारच १५४ प्रभाग रचना तयार असणाऱ्या या प्रभागातून ४१० सदस्य व ५४ सरपंच थेट जनतेतून निवडून जाणार आहेत असेही या वेळी सांगण्यात आले आहे. तसेच निवडणूक होत असलेल्या सर्वच्या - सर्व गावातील सरपंच पदाचे आरक्षण या पूर्वीच तहसील कार्यालयात जाहीर करण्यात आलेले आहे असेही सांगण्यात आले आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
शनिवार दि.६ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# जामखेड उपनगराध्यक्षांचे नगरसेवक पद धोक्यात?

## जातप्रमाणपत्र वादावर अंतिम युक्तिवाद पूर्ण, निर्णय राखीव!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** : जामखेड नगरपरिषद निवडणुकीतील वॉर्ड क्र. ३ मधील ओबीसी प्रवर्गातून निवडून आलेले उपनगराध्यक्ष यांच्या जातप्रमाणपत्राच्या वैधतेचा वाद आता शिगेला पोहोचला आहे. या प्रभागातील पराभूत उमेदवार ऋषिकेश विष्णू खरात यांनी दाखल केलेल्या तक्रारीवर अहिल्यानगर येथील जातपडताळणी समितीसमोर अंतिम युक्तिवाद पूर्ण झाला असून, समितीने हा निर्णय न्यायनिर्णयासाठी राखीव ठेवला आहे. त्यामुळे उपनगराध्यक्षांचे नगरसेवक पद राहणार की जाणार, याची कमालीची उत्सुकता जामखेडवासियांमध्ये निर्माण झाली आहे.

जामखेड नगरपरिषद निवडणुकीत वॉर्ड क्र. ३ मधून ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढवून उपनगराध्यक्ष विजयी झाले होते. मात्र, त्यांनी निवडणूक लढवताना सादर केलेले जातप्रमाणपत्र चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे मिळवल्याचा गंभीर आरोप पराभूत उमेदवार ऋषिकेश खरात यांनी केला आहे. खरात यांनी २९ जानेवारी २०२६ रोजी जातपडताळणी समिती आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे याविरोधात अधिकृत तक्रार दाखल केली होती.

तक्रारदाराच्या दाव्यानुसार, जातप्रमाणपत्र काढताना २९ जुलै १९१८ रोजीचा शिऊर गावचा 'गाव नमुना १४' जोडण्यात आला आहे, जो पूर्णपणे बनावट स्वरूपाचा आहे.या गाव नमुन्यात उल्लेख असलेल्या व्यक्तीचा आणि उपनगराध्यक्षांच्या वंशावळीचा कोणताही संबंध नाही.उपनगराध्यक्षांची सर्व मूळ कागदपत्रे ही 'मराठा' जातीची असून, त्यांनी केवळ नावातील साधर्म्याचा (साम्य) गैरवापर करून हे ओबीसी प्रमाणपत्र मिळवले आहे.उपनगराध्यक्षांनी हा पुरावा आपल्या आजोळचा असल्याचा दावा केला होता, मात्र तक्रारदाराने तहसील कार्यालय आणि संबंधित गावात चौकशी केली असता, तिथं आजोळचा कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे.

या गंभीर आरोपानंतर अहिल्यानगर येथील जातपडताळणी समितीसमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. गेल्या काही महिन्यांत १२ मे २०२६, १९ मे २०२६, २६ मे २०२६ आणि २ जून २०२६ रोजी यावर सविस्तर सुनावणी झाली. (नोंद: तारखांमधील प्रशासकीय नोंदीनुसार) अखेर काल, ४ जून २०२६ रोजी या प्रकरणावर दोन्ही बाजूंचा अंतिम युक्तिवाद पार पडला. समितीने आता या प्रकरणाचा निकाल राखून ठेवला आहे. जातपडताळणी समितीचा हा आगामी निर्णय जामखेडच्या स्थानिक राजकारणाला कोणती कलाटणी देणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

### सभापती राम शिंदे काय भूमिका घेणार?

जामखेड नगरपरिषदेवर सध्या भारतीय जनता पक्षाची (भाजप) सत्ता आहे. उपनगराध्यक्ष हे सत्ताधारी गटाचे असल्याने या संपूर्ण प्रकरणाकडे राजकीय दृष्टिकोनातूनही पाहिले जात आहे. या कायदेशीर पेचप्रसंगामुळे विधानपरिषदेचे सभापती तथा ज्येष्ठ नेते राम शिंदे आता कोणती राजकीय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण जामखेडकरांचे आणि राजकीय विश्लेषकांचे लक्ष वेधले गेले आहे.

# किरकोळ कारणावरून बाप-लेकाला बेदम मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील कानडगाव येथे किरकोळ कारणावरून एका शेतकऱ्यासह त्याच्या अल्पवयीन मुलास मारहाण करून शिवीगाळ व धमकी दिल्या प्रकरणी तिघां विरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेविषयी पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रज्जाक बक्शुभाई सय्यद (वय ५५, रा. कानडगाव, ता. राहुरी) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. २ जून २०२६ रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास त्यांचा मुलगा अली हा घरासमोरील रस्त्यावर खेळत होता.

त्यावेळी आरोपी असिफ बक्शु सय्यद तेथे आला व अली यास शिवीगाळ करत काठीने मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. मुलाचा आरडा ओरडा ऐकून रज्जाक सय्यद घराबाहेर आले असता त्यांनी मुलास मारहाण करण्या बाबत विचारणा केली. त्यावरून झालेल्या वादात असिफ सय्यद याने रज्जाक सय्यद यांना काठीने मारहाण करून त्यांच्या उजव्या हाताच्या अंगठ्या जवळ दुखापत केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यानंतर रियाज बक्शु सय्यद व अफरिन असिफ सय्यद हे देखील घटनास्थळी आले.

त्यांनी शिवीगाळ करून धमकावल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच अफरिन सय्यद हिने फिर्यादीच्या पत्नी नादिरा यांना शिवीगाळ करून खोट्या तक्रारीत अडकविण्याची धमकी दिली. याशिवाय फिर्यादीच्या कुटुंबाला तेथे राहू नये, पाण्याची मोटार सुरू करण्यासाठी येऊ नये, अन्यथा जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी असिफ बक्शु सय्यद, रियाज बक्शु सय्यद व अफरिन असिफ सय्यद (सर्व रा. कानडगाव, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ६४७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ११५(२), ११८(१), ३५१(२), ३५२ व ३(४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

# शेतजमिनीच्या वादातून घरावर हल्ला

## १५ ते २० महिलांसह एकाविरोधात गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई परिसरात शेतजमिनीच्या ताब्याच्या वादातून एका शेतकऱ्याच्या घरात घुसून तोडफोड, चोरी आणि धमकी दिल्याची गंभीर घटना घडली आहे. या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात एका व्यक्तीसह १५ ते २० अनोळखी महिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात खळबळ उडाली आहे. याबाबत भास्कर सोन्याबापू पालवे (वय ४५, रा. विठ्ठलवाडी, गणेशवाडी, ता. नेवासा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार अनिल हेमराज भळगट (रा. सोनई) व त्याच्यासोबत आलेल्या १५ ते २० अनोळखी महिलांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, गुरुवारी (दि. ५) सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास गट क्रमांक ५८३/२/ब मधील शेतजमिनीत आरोपींनी अनधिकृतपणे प्रवेश केला. यावेळी संबंधित महिलांनी जमीन अनिल भळगट यांनी कसण्यासाठी दिली असल्याचा दावा करत फिर्यादींना तेथून निघून जाण्यास सांगितले. त्यानंतर शिवीगाळ, दमदाटी करत शेतातील व घरासमोरील मालमत्तेची तोडफोड करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. घटनेदरम्यान मोटारसायकलचे नुकसान करण्यात आले. तसेच घरातील सीसीटीव्ही कॅमेरे, गव्हाची दोन पोती आणि काही संसारोपयोगी वस्तू चोरीस गेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या सर्व प्रकारात सुमारे ५१ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

याशिवाय जमिनीचा ताबा घेण्यास विरोध केल्यास खोटे ट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिल्याचाही आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी बाळासाहेब तागड करीत आहेत. दरम्यान, या घटनेनंतर परिसरातील कायदा व सुव्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून शेतजमिनीच्या वादातून तणाव वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### भळगट यांची जिल्हा पोलीस प्रमुखांकडे धाव

या प्रकरणात आपल्याविरोधात खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा दावा करत अनिल भळगट यांनी जिल्हा पोलीस प्रमुखांची भेट घेतली आहे. गुन्ह्याच्या नोंदीतील वेळ व घटनाक्रमाबाबत शंका उपस्थित करत त्यांनी सखोल चौकशीची मागणी केली. यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक पुरावे सादर करण्याच्या सूचना दिल्याची माहिती भळगट यांनी दिली.

# १५ जून पर्यंत संवत्सर पुलावरून वाहतूक सुरु झाली पाहिजे

## आ. आशुतोष काळे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : राज्यातील प्रमुख शहरांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा जुना मुंबई-नागपूर (एन.एच.७५२आय) महामार्ग शाळकरी विद्यार्थी, शेतकरी आणि प्रवासी यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा रस्ता असल्याने संवत्सर येथे गोदावरी नदीच्या पुलाच्या दुरुस्तीचे काम १५ जून पर्यंत पूर्ण करून पुलावरून वाहतूक सुरु झाली पाहिजे अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहे.



पुलाच्या दुरुस्तीचे काम दर्जेदार व्हावे यासाठी आ. आशुतोष काळे यांनी यापूर्वी देखील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी बैठका घेतल्या असून शुक्रवार (दि.०५) रोजी स्वतः अधिकारी आणि नागरिकांच्यासमवेत प्रत्यक्ष सुरु असलेल्या कामाची पाहणी केली. दळणवळणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या असलेल्या या महामार्गावरील संवत्सर येथील गोदावरी नदीच्या पुलाला काही महिन्यांपूर्वी मध्यभागी मोठे खड्डे पडले होते. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठी पुलावरून होणारी सर्व प्रकारची वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आलेली आहे.

कोपरगाव शहराला जोडणारा तालुक्याच्या पूर्व भागातील हा अतिशय महत्त्वाचा मार्ग असल्यामुळे शेतकरी, विद्यार्थी, स्थानिक नागरिक आणि प्रवासी यांना अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. याची दाखल घेऊन आमदार आशुतोष काळे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते विकास व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांची शासकीय निवासस्थानी भेट घेऊन व सातत्याने पाठपुरावा करून या पुलाच्या दुरुस्तीसाठी निधी आणला आहे. या निधीतून साधारणपणे दोन महिन्यांपूर्वी पुलाच्या दुरुस्तीचे कामही सुरु झाले आहे. परंतु काही दिवसांपासून हे काम संथ गतीने सुरु असल्यामुळे आ. आशुतोष काळे यांनी अधिकाऱ्यांना आणि ठेकेदाराला धारेवर धरले.

पावसाळा तोंडावर येऊन ठेपला असून हे काम वेळेत पूर्ण होणे अत्यंत गरजेचे आहे. कामाचा वेग तात्काळ वाढवून कोणत्याही परिस्थितीत १५ जून पर्यंत पुलावरून वाहतूक सुरु झाली पाहिजे अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांना आणि ठेकेदाराला दिल्या आहेत. यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांचे पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राहुरीतील खुनाचा ७२ तासांत छडा

## पोलीस निरीक्षक ठेंगे यांचे नेतृत्वाखाली आरोपी गजाआड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : येथे विद्यापीठातील कंत्राटी कामगाराचा अत्यंत क्रूर पद्धतीने खून करण्यात आला होता. त्या खून प्रकरणात राहुरी पोलिसांना एक आव्हान होते. राहुरी पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली राहुरी पोलिसांनी केवळ ७२ तासात या गंभीर गुन्ह्यांचा छडा लावुन त्या गुन्ह्यातील आरोपीला गजाआड केल्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या कामगिरीमुळे राहुरी पोलीस स्टेशनच्या संपूर्ण पथकाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.



घडलेल्या या घटनेत राहुरी-शनिशिंगणापूर रोडलगत असलेल्या महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत कापूस सुधार प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावरील कार्यालयात कंत्राटी मजूर म्हणून कार्यरत असलेल्या श्रीकांत पोपट दोंदे (वय २७) या तरुणाची अज्ञात व्यक्तीने तीक्ष्ण हत्याराने निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना मंगळवार, दि. २ जून रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास घडली होती.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, गुन्हा घडल्यानंतर अवघ्या ७२ तासांच्या आत राहुरी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपी महेश भाऊसाहेब मंचरे वय ३० वर्षे या आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत .पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, सहाय्यक पो.निरीक्षक लवांडे, हवालदार अर्जुन दारकुंडे, प्रमोद ढाकणे, भाऊसाहेब शिरसाठ, यांच्या तत्पर आणि परिणामकारक कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. गेल्या पंधरा दिवसांपूर्वी राहुरी पोलिसांनी अनेक गंभीर गुन्ह्यांचा यशस्वी छडा लावला आहे. राहुरी तालुक्यातील मोमीन आखाडा येथील गंगाराम कोहकडे यांच्यावर झालेल्या गोळीबार प्रकरणातील आरोपी प्रविण कोहकडे तसेच उंबरे येथील सत्यवान साठे यांच्या खून प्रकरणातील आरोपी सुशील साठे याला पोलिसांनी आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अल्पावधीत जेरबंद केले होते.

# मराठा आंदोलन-मृतांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रूपये

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई** : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी झालेल्या विविध आंदोलनांतील मृतांच्या वारसांना राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. आठ जिल्ह्यांतील ३४ व्यक्तींच्या कायदेशीर वारसदारांना प्रत्येकी १० लाख रुपयांप्रमाणे एकूण ३ कोटी ४० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. मराठा समाजाच्या मागण्यांसाठी राज्यातील विविध ठिकाणी झालेल्या आंदोलनांत एकूण ३०९ कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने या मृत व्यक्तींच्या वारसदारांसाठी २७ कोटी ५० लाख रुपये मंजूर केले आहेत. यापैकी ३४ व्यक्तींच्या कुटुंबांना मदत मिळणे अद्याप बाकी होते. अंतरवाली सराटी येथील मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी मृतांच्या वारसदारांना दिल्या जाणाऱ्या मदतीचा प्रश्न उपस्थित केला होता.

यासंदर्भात जलसंपदा मंत्री कृष्णा व गोदावरी खोरे मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून उर्वरित वारसांना तातडीने मदत देण्याची ग्वाही दिली होती. राज्य सरकारने मागील दोन दिवसांत केलेल्या कार्यवाहीमुळे विविध जिल्ह्यांतील एकूण ३४ मृत व्यक्तींच्या वारसदारांना प्रत्येकी १० लाख रुपये, याप्रमाणे एकूण ३ कोटी ४० लाख रुपयांची मदत तातडीने मंजूर केली आहे. यामध्ये बीड जिल्हयातील १५, धाराशिव ५, परभणी ४, हिंगोली ४, नांदेड ३, जालना १, छत्रपती संभाजीनगर १ आणि लातूर १ अशा वारसांचा समावेश आहे, अशी माहिती उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे यांनी दिली.

# महावितरणचा कंत्राटी वायरमन लाच लुचपतच्या जाळ्यात

## ५० हजारांच्या लाचेचा आरोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : हॉटेलमधील वीज चोरीप्रकरणी कारवाई न करण्यासाठी एका कंत्राटी वायरमनने हॉटेल चालकाकडे तब्बल ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली या प्रकरणी महावितरण कंत्राटी वायरमन गणेश माधव दातीर (रा. पिंप्री लौकी, ता. संगमनेर) याला अहिल्यानगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास ताब्यात घेतले आहे .या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

संगमनेर शहरालगत कोल्हेवाडी रोडवर असलेल्या एका हॉटेलमध्ये वीज वितरण यंत्रणेच्या डीपीवरून बेकायदेशीररीत्या वीज वापर सुरू असल्याची माहिती कंत्राटी वायरमन गणेश दातीर याला मिळाली होती. त्यानंतर त्याने संबंधित ठिकाणी जाऊन वीजचोरीचा प्रकार उघडकीस आणला. तसेच चोरीसाठी वापरण्यात आलेली वायरही काढून घेतली. मात्र, यानंतर संबंधित हॉटेल चालकावर वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत कारवाई करण्याची भीती दाखवत हे प्रकरण जागेवरच मिटवून घेण्यासाठी दातीर याने ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. तक्रारदाराकडे त्याने वारंवार पैशांसाठी तगादा लावल्याने संबंधित हॉटेल व्यावसायिकाने थेट अहिल्यानगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.

या तक्रारीची पडताळणी केल्या नंतर एसीबी अधिकार्यांनी सापळा रचला. चौकशीदरम्यान दातीर याने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याचे सांगण्यात येत आहे. जरी त्याने प्रत्यक्ष रक्कम स्वीकारलेली नसली तरी तक्रारदाराकडे वारंवार पैशांची मागणी आणि त्याचा पाठ पुरावा केला त्यामुळे त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली.

या घटनेमुळे महावितरणच्या कंत्राटी कर्मचार्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, वीज चोरीच्या सारख्या गंभीर प्रकरणांचा गैरफायदा घेत आर्थिक लाभ मिळविण्याचा काही जण प्रयत्न करीत असल्याची चर्चा शहरात रंगली आहे.दरम्यान, एसीबीच्या या कारवाईमुळे संगमनेर तालुक्यात खळबळ उडाली असून, पुढील तपास सुरू आहे.

# कशी नशीबाने थट्टा आज मांडली

## नगरसेवकांच्या स्वप्नाचा चक्काचूर

**अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : अहिल्यानगर विधान परिषद निवडणुक बिनविरोध झाल्याने एकीकडे गुलालाची उधळण व जल्लोष साजरा केला जात असताना विधान परिषद बिनविरोध झाल्याने मतदान करणाऱ्या मतदार राजा वर मात्र कुऱ्हाड कोसळली असून हाता तोंडाशी आलेला घास हिसकावल्याने आज कशी नशीबाने थट्टा आज मांडली असे म्हणण्याची वेळ नगसेवक मतदारावर आली आहे. विधान परिषद निवडणुक म्हटले की, मतदान करणाऱ्या नगरसेवकांची दिवाळी असते , ठरावीक मतदान असल्याने नगरसेवकांचे मोठे वजन वाढून जाते.

जोपर्यंत मतदान होत नाही तोपर्यत उमेदवार नगरसेवकांना सांभाळण्यासाठी उमेदवारांना मोठी कसरत करावी लागते तसेच त्यांना खुष ठेवण्यासाठी सर्वच प्रकारे काळजी घेतली जाते. अहिल्यानगर विधान परिषदेचे गणीत पहाता आता पर्यत जेवढ्या निवडणूका झाल्या त्यात नगरसेवकांना मोठा नजराणा मिळत आला. त्यामुळे निवडणूक जिंकून आल्यानंतर नगरसेवकांची खरी कमाई असल्याने विधान परिषदेच्या निवडणुकीकडे सर्वाचे लक्ष लागलेले असते. त्यांच्या पंचवार्षिक मधला हा सर्वांत मोठा मानपानाचा व आर्थिक सक्षम होण्याचा राजमार्ग असतो. मात्र या वेळी निवडणूक बिन विरोध झाल्याने रंगवलेल्या स्वप्नावर पाणी पडल्याचे दिसून आले आहे. याचा सर्वात मोठा फटका गरीब नगरसेवकांना बसला आहे कारण त्यांच्या आयुष्यातील हा क्षण त्यांनी गमावला आहे. हा दिवस त्यांच्या कायम स्मरणात राहील की आम्ही नगरसेवक होतो तेव्हा विधान परिषद निवडणुक कोरडी झाली ही सल कायम मनात घर करून राहिल.

ही निवडणूक सुरवातीला जेवढी चुरशीची होईल असे वाटत होते तसे चित्र शेवटाला अस्त पावले.

शेवटच्या टप्प्यात प्राजक्त तनपुरे श्रीरामपूरचे करण ससाणे व नगरचे दत्तात्रय पानसरे यांच्यात तुल्य बळ होईल असे वाटत होते. मात्र ससाणे, पानसरे यांनी माघार घेताच जिल्ह्यातील २२९ नगरसेविकांच्या भावनांचा चक्काचूर झाल्याचे अनेक नगरसेवकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. बिनविरोध निवडून आलेले आ. तनपुरे जरी खुश असले तरी नगरसेवकांच्या पदरी निराशा पडली आहे.

# अंमळनेर नदीपात्रातील अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांची धडक कारवाई

## तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील अंमळनेर येथील नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा व वाहतुकीवर सोनई पोलिसांनी धडक कारवाई करत सुमारे तीन लाख तीन हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे अवैध वाळू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांना अंमळनेर शिवारातील नदीपात्रात बेकायदा वाळू उपसा सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.



त्यानुसार विशेष पथकाने गुरुवारी (दि. ५) दुपारी सुमारे २.४५ वाजता छापा टाकला. घटनास्थळी एका विनानंबर टेम्पोमधून नदीपात्रातील वाळूची वाहतूक सुरू असल्याचे आढळून आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत टेम्पोसह अर्धा ब्रास वाळू जप्त केली. जप्त टेम्पो आणि वाळूसह एकूण तीन लाख तीन हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.

या प्रकरणी पोलीस नाईक देवीदास आव्हाड यांच्या फिर्यादीवरून किशोर बाबासाहेब शिसोदे (वय २९, रा. खलाल पिंपरी) व अन्य तीन अनोळखी व्यक्तींविरुद्ध सोनई पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीमुळे पर्यावरणाचे नुकसान होत असून शासनाचा महसूल बुडत असल्याने अशा कारवायांना अधिक गती देण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. पुढील तपास पोलीस नाईक देवीदास आव्हाड करीत आहेत.